
९ मार्च १९६८
माणूस
चाळीस पैसे
कळीं… णें त्राजिरवाणें
…गर : स्वयंचलनाचें पहिलें पाऊल
Protest against food imports
"The Times of India" News Service
AURANGABAD, January 31: Some 500 people have begun a pada yatra from Aurangabad to Bombay to protest against the import of food grains from abroad. It has been organised by Mr. S. G. Majgaonkar, editor of "Manoos," a Marathi weekly from Poona.
According to the organisers of this "food march," Indians should prefer to "die hungry" rather than be reduced to beggary. They feel that shortage of food can be met by avoiding waste.
The yatra started at the Kailash temple, Ellora on Republic Day. The marchers will proceed through Paithan, Sangamner and Nasik, reaching Bombay on March 29.
Addressing the marchers on Republic Day, the Mayor of Poona, Mr. N. G. Goray, said the yatra was a challenge to the people to energise themselves into tackling the vital problem of food. He complimented the organisers on selecting a sacred day and place to begin the yatra.

४





## खताच्या उत्पादनासाठी

पातळ अमोनियाची
आयात करण्याचा निर्णय केंद्र सरकारने
घेतल्याची वार्ता यात्र सुमारास वाचण्यात आली.
धरमसी मोरारजीच्या खताच्या कारखान्याची योजना
या अमोनियाच्या आयातीच्या प्रश्नावरच बारगळली होती.
आता १९७०–७१ साली खताची जी मागणी होईल
तिची तोंडमिळवणी कशी करावयाची
याची विवंचना केंद्र सरकारला लागली
आणि
त्यामुळेच हा अमोनिया–आयातीचा निर्णय
तातडीने घेतला गेला
असे सांगण्यात आले आहे.
धरमसीच्या कारखान्यासाठी
तीन ते साडेतीन कोटी रुपयांचा
पातळ अमोनिया आयात करावा लागेल.
गंधक व इतर कच्चा माल मिळून
या कारखान्यासाठी होणारी एकूण आयात
सुमारे बावीस कोटी.

समग्र साप्ताहिक
# माणूस

वर्ष : सातवे : अंक : एकेचाळीसावा
वार्षिक वर्गणी : वीस रुपये
परदेशची वर्गणी : चाळीस रुपये

**संपादक**
**श्री. ग. माजगावकर**
साहाय्यक
**दिलीप माजगावकर**
**सौ. निर्मला पुरंदरे**

---

**स. न.** **फेब्रुवारी, २८**

'श्रीकैलास ते सिंधुसागर' या संचालनाची मागील अंकापर्यंतची माहिती वाचली. स्वावलंबनाची जी भावना आपणांस जनमानसांत निर्माण करावयाची आहे, त्यासाठी महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांत कार्यक्रमाविषयी आस्था निर्माण करणे आवश्यक आहे आणि म्हणून आपणास एक नम्र सूचना करावीशी वाटते की, या संचालनामागील आपली भूमिका स्पष्ट करणारी पत्रके काढून ती सर्व महाविद्यालयांच्या प्राचार्यांकडे पाठवून, सूचना-फलकांवर लावण्याची विनंती करावी.

**श्री. का. चुरी**
**रा. ना. ओक,**
मुंबई

---

**मूल्य चाळीस पैसे**
**४१९ नारायण**
**पुणे २**
**दूरध्वनी : ५७३५९**

प्रकाशित लेख, चित्रे, इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

# आसाम खदखदत आहे
# 'आम्हाला काय त्याचे?'

१९६२ मधल्या चिनी आक्रमणामुळे आपल्याला राष्ट्रीय एकात्मतेची आठवण झाली आणि तेव्हापासून दरवर्षी २० ऑक्टोबरला राष्ट्रीय एकात्मता दिन पाळण्यात येतो. परंतु केवळ 'दिन' पाळून एखादी वृत्ती वा शिकवण आचरणात येत असेल तर मग सर्व राष्ट्रीय विभूतींच्या जयंति आणि पुण्यतिती साजऱ्या करणाऱ्या या देशाला एकात्मतेची आठवण करून देण्यासाठी एक निराळा दिवस पाळण्याची आवश्यकता भासली नसती.

चिनी आक्रमणाचा अनपेक्षित तडाखा बसल्यानंतर आंतरराष्ट्रीय सहजीवनाच्या स्वप्नात दंग असलेल्या आपल्या राष्ट्रीय नेतृत्वाला जाग आली आणि मग सारा भारतवर्ष गेल्या कित्येक शतकांपासून एकात्म कसा आहे हे तारस्वराने सांगण्याची चढाओढ सुरू झाली. आतापर्यंत हेतुपुरस्सर उपेक्षा केलेल्या इतिहासाच्या काही पानांचे सोईस्कर पठण झाले. बरे उशिरा का होईना, पण चूक उमगून आली ही गोष्टही काही कमी समाधानाची नव्हती. परंतु तसेही घडले नाही. जेवढ्या आकस्मिक रीतीने आम्हाला जाग आली तेवढ्याच आकस्मिक रीतीने चिनी आक्रमणाने शिकविलेला धडा आम्ही विसरून गेलो. काँग्रेस काय किंवा इतर कोणताही राजकीय पक्ष काय या सर्वांच्या देशाच्या सर्व भागात शाखा आहेत म्हणून प्रत्येकजण स्वतःला 'अखिल भारतीय' म्हणवून घेत असतो. परंतु ही 'अखिल भारतीय' वृत्ती कोणत्याही एका पक्षाच्या वा नेत्याच्या आचरणात प्रतीत होते काय असा प्रश्न विचारला तर त्याला नकारार्थी उत्तर द्यावे लागते.

**दिल्ली दरबार**

हे सारे विचार आज सुचण्याचे कारण असे की, आपल्या पूर्व सीमेवरच्या आसाम राज्यात सध्या जी स्फोटक राजकीय परिस्थिती निर्माण झाली आहे तिच्यासंबंधी गंभीर विचार करायला कोणाचीच तयारी दिसत नाही. गेल्या २६ जानेवारीला गोहत्ती शहरात आसामी विद्यार्थ्यांनी दंगल आणि जाळपोळ करून बाजारपठेतील मारवाडी व्यापाऱ्यांच्या मालमत्तेची होळी केली. महाराष्ट्राप्रमाणेच आसाममधल्या लहानशा खेडेगावापर्यंत मारवाडी दुकानदार पोचला असून त्याचे अस्तित्व आतापर्यंत कोणालाच खटकत नव्हते. परंतु आता आसाम राज्य केवळ आसामी भाषिकांसाठीच असले पाहिजे ही मागणी जोराने पुढे आली असून या मागणीबाबत आपण किती उतावीळ आहोत हे सिद्ध करण्यासाठी प्रजासत्ताक दिनाचा मुहूर्त साधून गोहत्तीतील बाजारपेठ उध्वस्त करण्यात आली. आणि गंमतीची गोष्ट ही की, आसाममध्ये आपले व्यापारी प्रभुत्व प्रस्थापित व्हावे या हेतूने तेथे गेलेल्या सिंधी आणि पंजाबी व्यापाऱ्यांनीही आपला एक प्रतिस्पर्धी अनायासे नष्ट होत आहे या विचाराने या दंगलीचा पाठपुरावा केला.

## नेभळट धोरण

गौहत्तीतील बाजारपेठ जवळ असताना तेजपूर, शिलाँग आदी शहरांतही आपल्या 'प्रादेशिक अस्मिते'चे दर्शन घडविण्यासाठी आसामी युवक बाह्या सरसावून सिद्ध झालेले होते. तेजपूर येथल्या आसाम साहित्य संमेलनात त्याची कुजबूजही ऐकू येत होती. परंतु तेथे असलेल्या राखीव पोलिस दलाच्या तुकड्यांनी सर्वत्र कडेकोट बंदोबस्त ठेवल्यामुळे केवळ गौहत्तीवरच निभावले. गौहत्तीतील बाजारपेठ लुटली जात असताना आसामी पोलिस हा प्रकार स्वस्थ बसून पहात होते. कारण त्यांनाही त्या वेळी आपल्या कर्तव्यापेक्षा प्रादेशिक अस्मितेची जाणीव झाली होती.

लचित सेना नावची एक युवक संघटना आसाममध्ये स्थापन झाली असून आसाम केवळ आसामी भाषिकांसाठीच असला पाहिजे अशी तिची प्रतिज्ञा आहे. या सेनेमार्फत गौहत्तीतील जाळपोळीचा एवढा पूर्वनियोजित प्रकार होऊनही अद्याप आसाम सरकारला या सेनेच्या सूत्रधारांचा सुगावा लागलेला नाही. यावरून या सेनेकडे पाहण्याची आसाम सरकारची दृष्टी कशी आहे याचा बोध होतो. मिझो बंडखोरांच्या उग्र अवताराला भिऊन आसामच्या पुनर्रचनेला केंद्र सरकार तयार झाल्याचे आढळून येताच लचित सेनेचा जन्म झाला. नागा आणि मिझो बंडखोरांच्या शस्त्रसामर्थ्यापुढे लोटांगण घालणारे राज्यकर्ते आसामच्या किंवा पर्यायाने संपूर्ण देशाच्या सुरक्षिततेचा काहीच विचार करीत नाहीत. या त्राग्यातून लचित सेनेचा जन्म झाला आहे. त्यामुळे प्रत्येक राज्यात आज जो प्रादेशिक वाद उफाळून येत आहे त्याला आमच्या केंद्रीय सत्ताधाऱ्यांचे नेभळे धोरणच कारणीभूत आहे. याबद्दल बिलकुल वाद नाही.

आसामी जनतेचे गाऱ्हाणे रास्त आहे हे मान्य करूनही, लचित सेनेचा भस्मा-

सूर निर्माण करून ती आपला उद्धार कसा करून घेणार आहे, हे मात्र समजत नाही. कारण एक तर ' आसाम आसामी भाषिकांसाठी ' ही घोषणा केवळ राष्ट्रीय एकात्मतेशीच विसंगत आहे असे नसून ती राष्ट्राच्या सुरक्षिततेलाही घातक ठरणार आहे. आसाममधील मुस्लीम नेते आसाम सरकारऐवजी पूर्व पाकिस्तान सरकारकडे अधिक आपुलकीने पहात आहेत ही वस्तुस्थिती ज्यांना नाकारावयाची असेल त्यांच्या राजकीय अकलेची तारीफ करावी तेवढी थोडीच आहे. परंतु जो डोळे उघडे ठेवून वावरत आहे आणि ज्याला राष्ट्रीय सुरक्षिततेची चाड आहे अशा नागरिकाला आसामी मुसलमान कोणती भाषा बोलत आहेत, ते कसे वागत आहेत हे कळायला फारशी अडचण पडणार नाही.

## केंद्र सरकारचे दुर्लक्ष

आज आसामी नागरिक, बंगाली माणसाशी, मारवाडी माणसाशी किंवा तत्सम आसामेतर भाषिक भारतीय नागरिकांशी वैर करू इच्छितो. त्यासाठी आसाममधील जात्यंध मुसलमानाला जवळ करावयास त्याला किंचितही संकोच वाटत नाही. परंतु आसाममध्ये सध्या वास्तव्य करीत असलेल्या मुसलमानांपैकी ' राष्ट्रीय वृत्तीचे मुसलमान किती, पाकिस्तानकडे आपुलकीने पहात असलेले मुसलमान किती आणि त्याहून महत्त्वाची गोष्ट ही की, पाकिस्तानातून आसाममध्ये घुसलेले मुसलमान किती आणि या सर्वांची प्रवृत्ती कोणती आहे याचा ' आसाम आसामी भाषिकांसाठी' असली सवंग घोषणां करणाऱ्या लचिन सेनेला आणि तिला उदार आश्रय देणाऱ्या आसामी जनतेला काहीतरी थांगपत्ता लागलेला आहे का, हा खरा या संदर्भातील महत्त्वाचा प्रश्न आहे.

परंतु या प्रश्नाचा विचार करावा असे आज तरी कोणालाही वाटत नाही. केंद्रीय गृहमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण मध्यंतरी तातडीने गौहत्तीला जाऊन आले. पण त्यानंतर केंद्र–सरकारकडून कोणतीच हालचाल झालेली नाही. आसामचे मुख्य मंत्री श्री. चालिहा यांनाही दिल्लीस येण्याची गरज वाटली नाही. आसामचे भूतपूर्व अर्थमंत्री श्री. फकरुद्दिन अली महमद याना केंद्रीय मंत्रिमंडळात घेतल्यापासून चालिहा ' दिल्लीश्वरां 'शी फटकून वागू लागले आहेत. याचा परिणाम असा झाला आहे की, केंद्र सरकार आणि आसाम सरकार यांच्या दरम्यान प्रशासन कार्याबद्दल कोणताच ' संवाद ' होत नाही. राज्य सरकारची केवळ स्वत:पुरते पाहण्याची संकुचित वृत्ती आणि केंद्र सरकारचे ' आम्हाला काय त्याचे ' हे बेपर्वाइचे धोरण यामुळे पूर्व सीमेची सुरक्षितता आणि त्याबरोबरच राष्ट्रीय एकात्मता धोक्यात येत आहे. ही परिस्थिती अशीच चालू राहिली तर आसामच्या भवितव्याचे निदान करणे अवघड जाणार आहे.

– सदाशिव पेठकर


शेतीसाठीं
महाराष्ट्र बँक सहाय्य करते.
आपल्या नजिकच्या शाखेस भेट द्या
दि बँक ऑफ
महाराष्ट्र लि.
११९ शाखासह आपल्या सेवेस सिद्ध.
खते
बीयाणे

# दा दू मि या



परवा गुजरातच्या एका काँग्रेस प्रमुखाशी बातचीत करीत होतो. कच्छच्या निर्णयाने माझे रक्त नुसते "उकळत" होते. माझ्या अंतरीच्या भावना या प्रमुखास सांगताच हे सदगृहस्थ थंडपणे म्हणाले, " हा उलट आपलाच विजय आहे. साडेतीन हजार चौरस मैलांपैकी फक्त सव्वातीनशे मैलच आपण पाकिस्तानला दिले आहेत ना ?"

आमचे वरील काँग्रेस प्रमुख एके काळी माझे मास्तर होते. सरदार पटेलांचे वारस स्वतःला म्हणवून घेत. मोठे हुषार व सडेतोड राजकारणी असा त्यांचा गुजरातेत दबदबा आहे. त्यांनीच असे म्हटल्यावर मी बाकीच्या गुर्जर पुढाऱ्यांपासून काय अपेक्षा करावी ?



अर्थात सारे गुजराती पुढारी काही अगदी " हे " नाहीत. ज्यांचे रक्त उसळले अशांपैकी मुख्य म्हणजे भाईकाका पटेल. वय वर्षे ७१. स्वतंत्र पक्षाचे गुजरातमधील सर्वेसर्वा. धंद्याने इंजिनियर, मनाने शिक्षणाधिकारी पण परिस्थितीने राजकीय पुढारी. तीच गत पुरीच्या शंकराचार्यांची. जन्माने गुजराती ब्राह्मण. आडनाव दवे. दोघांनीही कच्छचा निर्णय जाहीर होताच ओरडून सांगितले, " एक इंचभरही जागा शत्रूला मिळणार नाही. " गुजरातेत अहमदाबाद येथे अॅसेंब्लीत या वृद्ध तरुणाने अशी धमाल उडवून दिली की, हितेन्द्रभाई ताबडतोब विमानाने दिल्लीला रवाना झाले. " माझे आई, सांभाळ मला, इथे तर माझ्या विरोधी लोकांनी युद्ध जाहीर केले आहे."

कच्छच्या बाबतीत भाईकाका पटेल यांचा अधिकारच आहे तसा. या भीष्मराजास सिंध व कच्छ यांची जेवढी माहिती आहे, तेवढी मला नाही वाटत, सध्या कोणाही राजकीय व्यक्तीस असेल. याचे कारण सिंधमध्ये सक्कर बॅरेजच्या कामावर इंजिनियर असताना तीन वर्षे ही सारी भूमी भाईकाकांच्या डोळ्याखालून गेली आहे. त्यांच्या वेळेस इंजिनिअर म्हटला की सरकारी जीप व फुकट पेट्रोल नव्हते. १९६५ साली कच्छमध्ये गडबड चालली आहे याची सर्वप्रथम वातमी या भाईकाकांनी अहमदाबादेच्या राज्यपालांना दिली. दुर्दैवाने हे सद्गृहस्थ दिल्लीने " पाळलेल्या " काही राष्ट्रीय मुसलमानांपैकी एक होते. त्यांनी भाईकाकांना काय सांगितले ? म्हणे, जनतेत घबराट होईल असे काही बोलू नका ! भाईकाकांनी गुजरातच्या मुख्य मंत्र्यांना ही खबर सांगितली. त्यांना गुजरातमध्ये पाकिस्तानी लांडगा येईल; हे खरेच वाटेना. भाईकाकांनी कपाळावर हात मारून घेतला.

कच्छप्रदेशाचा इतिहास व भूगोल मोठा मनोरंजक आहे. १६,५६७ चौरस मैलांपैकी ९,००० चौरस मैल नुसते रणच आहे. रण म्हणजे अक्षरशः वैराण भूमी. वर सूर्य व खाली वाळू. आजूबाजूसही सर्वत्र वाळू. उंट अथवा जीप असेल तर प्रवास शक्य. नाहीतर पाण्याशिवाय तडफडून मृत्यू " गॅरंटीड "! मात्र हे रण पूर्वीच्या काळी समृद्ध असावे. द्वारकेत ज्या वेळी श्रीकृष्ण राज्य करी त्या वेळेस हे रण समृद्ध असावे. द्वारकेचे डुबणे व या समृद्धीचे वाळवंट होणे बहुधा एकाच निसर्गाच्या तडाख्याने शक्य झाले असावे.

दोनशे वर्षांपूर्वी कंजरकोट विभागात सिंधमधून आलेल्या पूर्व कालव्याच्या

# कच्छ कहाणी

पाण्यामुळ सवत्र समृद्धी होती. प्राचीन वैदिक काळात या नाल्यास "विपासा" म्हणत. कालांतराने विपासा नदीचा प्रवाह आटला. तरीसुद्धा पंजाबमध्ये त्रिठनकोट येथे सिंधूस पूर आला की विपासा नदी भरून जाई. त्यामुळे मिरपूरखास ते उमरकोट या प्रदेशात शेती भरपूर होई. यांच पाण्याच्या जोरावर कच्छमध्ये भातशेती भरपूर होई. गहूही चांगला पिके. अठराव्या शतकात मीर गुलामशाह ह्या सिंधच्या राजाने कच्छच्या हिंदू राज्यावर स्वारी केली व (नेहमीप्रमाणे) हा जिंकला. विपासा नदीस त्याने बांध घातला व तीन हजार एकर भूमीची मशागत करणाऱ्या कच्छीं लोकांना त्यांनी बेकार केले. ही सारी भूमी वैराण झाली. (पुढे नेहरूंनी Indus canal water treaty वर सही करून इतिहासाची राजस्थानाच्या सीमाप्रांतांत पुनरावृत्ती करून दाखविली !) १९ व्या व २० व्या शतकांत या खेडूत कच्छ लोकांनी नांगर सोडला व तराजू हाती धरला. आज १५००० कच्छी लोक परदेशांत व्यापार करीत आहेत.

## अजब न्याय

हा " मीरवाह " बांध आमच्या सर्वोदयवादी सरकारने जर तोडला तर आज-ही कच्छच्या रणात शेती होऊ शकेल. पण आमच्या पंचवार्षिक योजना रशियन योजनांची कार्बन कॉपीज् असतात. राष्ट्रीय संपत्ती, तीसुद्धा भारतीय, त्या योजनेत येण्याचे कारण काय ? पाकिस्तानास आज एवढ्या पाण्याची जरूरच नाही. सिंधू व तीच्या उपनद्या यांनी सिंध व पंजाब येथे जवळजवळ दीड कोटी एकर जमीन भिजते. एप्रिल ते ऑक्टोबर या काळात सिंधूचे लाखो क्यूसेक् पाणी अरबी समुद्रात वाया जाते ! सिंधूस पूर येतो त्या वेळी दर सेकंदाला सहा लाख घनफूट पाणी साग-रात फुकट जाते. या जादा पाण्याचा उपयोग करण्यासाठी पाकिस्तानला जास्त जमिनीची गरज आहे ही गोष्ट कबूल. पण ती भारताने द्यावी हा कोठला न्याय ? पण हा न्याय आहे खरा. १९६५ च्या जानेवारी महिन्यात पाकिस्तानाने भारताची तेरा हजार एकर जमीन बळकावली. या भूमीसाठी कालवे खोदले. सुंदर रस्तेही बांधले. आमच्या भारत सरकारास म्हणे या प्रकाराची माहिती नव्हती ! पाकि-स्तान " भारत " असता तर कदाचित निषेधाचा खलिता आपल्याकडे धाडला गेला असता !

पाकिस्तानचे पुढारी भारतीय राजकारणी व तज्ज्ञ चाणक्याचे खरेखुरे वारस आहेत. देशाचे फॅमिली प्लॅनिंग त्यांनी अल्पसंख्याकांना बाहेर हाकलवून केले. एकट्या १९६४ साली पाकिस्तानने आठ लाख सत्तर हजार माणसांना त्यांच्या जमिनी व घरेदारे लुबाडून भारतात पाठवून दिले. आमच्या निधर्मी राजकीय पुढाऱ्यांना विशेष सांगावेसे वाटते की, या निर्वासितांत अठ्ठेचाळीस हजार ख्रिस्ती व एकवीस हजार बुद्धधर्मीय लोक आहेत ! युरोपियन वा चीनी-जपानी सरकार काय म्हणेल याची यत्किंचितही पर्वा पाकिस्तान करीत नाही. १९४७ साली पूर्व



कुटुंबनियोजनाची नवी पद्धत

पाकिस्तानात हिंदू, बौद्ध व ख्रिस्ती लोकांची संख्या एक कोटी व तीस लाख एवढी होती. आज ती फक्त पंच्यायशी लाख आहे. आहे की नाही पाकिस्तानी कुटुंब नियोजन !

## तेलाचा वास

"पण लोकसंख्या वा धान्योत्पादन एवढाच पाकिस्तानचा हेतू कच्छ बळकावण्यात नाही," भाईकाका मला सांगत होते. कच्छविषयी मला जास्त माहिती पाहिजे होती "कच्छच्या रणात भरपूर तेल आहे व पाकिस्तानास हे तेल पाहिजे आहे, अमेरिकन तेल कंपन्यांशी पाकिस्तानने या तेलासाठी केव्हाच करारही करून टाकले आहेत !" पाकिस्तानी योजना मोठ्या "बढिया" असतात. डॉ. करमरकर हे पाकिस्तानात रेल्वेत असिस्टंट सर्जन होते. त्यांचा बंगला "आपल्या मुलीसाठी" त्याच्या नोकराने फाळणीआधीच म्हणे रिझर्व्ह केला होता ! आणि गंमत म्हणजे या नोकराचे त्या वेळेस अजून लग्न व्हायचे होते !

१९३६ साली भाईकाकांना एका अमेरिकन इंजिनियरांनी सांगितलेली हकीकत मजेदार आहे. या इजिनियरांनी ब्रिटिश हद्दीत तेल मिळते का याचा तपास करण्याची परवानगी मिळविली होती. पाहणी केली व आढळून आले, की या रणांत तेल भरपूर आहे. एक खोल खड्डा खणून साहेबाने तेथे बत्ती शिलगावतांच एकदम मोठा धडाका झाला. त्यावेळेस कच्छवर राज्य कॉंग्रेसचे नव्हते. स्फोट होताच कच्छच्या महाराजांनी आपले सैनिक धाडून त्या साहेबास गिरफदार केले. त्याने त्याचा परवाना दाखविला. "हे राज्य आमचे आहे. आपला परवाना ब्रिटिश हद्दीतच लागू होतो," असे सांगून महाराजांनी त्या अमेरिकन तज्ज्ञांना हद्दपार केले.

१९३९ साली भाईकाका सिंध प्रांताचे स्पेशल रोड इंजिनियर होते. बरीन ते अहमदाबाद हा रस्ता ताबडतोब तयार करावा अशी सूचना देताना भाईकाकांनी कच्छच्या रणात तेल आहे म्हणून या रस्त्यास पुढे फार महत्त्व येणार आहे असे सरकारला कळविले होते. सिंध सरकारच्या दप्तरात ही माहिती असल्यामुळे कच्छच्या रणाचा ३,५०० चौरस मैलांचा विभाग पाकिस्तानने भारताकडे १९६० साली मागितला. स्वातंत्र्य मिळाल्यावर भाईकाकांनी ही माहिती सरदार पटेल यांना कळविली. धीरुभाई देसाई त्यावेळेस स्वित्झर्लंडमध्ये होते. त्यांच्यामार्फत सरदारांनी दोन रुमानियन तज्ज्ञ मिळविले. दुर्दैवाने या तज्ज्ञांना त्यावेळेस गुजरातच्या सरकारने सहकार्य दिले नाही. गुजरातमध्ये पाणीही नाही व तेलही नाही अशी येथे समजूत होती की काय न कळे. सहा महिने मुक्काम करून हे दोन रुमानियन इंजिनियर्स युरोपात हात हालवीत परत गेले. भाईकाकांनी जोर देऊन पुन्हा मला सांगितले, " पाकिस्तान रण उपर दावो करे छे एनु मुख्य कारण तो तेल छे. " ते पुढे म्हणाले, " पाकिस्तान जागृत आहे. आमचे सरकार अजून कुंभकर्णाच्या झोपेतच दिसते आहे. इथली एकूण एक बातमी पाकिस्तानला ताबडतोब कळते. आणि आमचीच माहिती आमच्या सरकारला नसते. "

### संरक्षणाकडे दुर्लक्ष

या उतारवयात प्रवास करण्याचा भाईकाकांचा उत्साह अजब आहे. १९६५ च्या मेमध्ये ते काही मित्र घेऊन कच्छचे रण " पाहावयास " जीपने निघाले. रणात क्षार पुष्कळ असावेत. रस्ता ओबडधोबड असला तरी खूप कठीण आहे. म्हणून जीप ऐंशी ते नव्वद किलोमीटरच्या वेगाने सहज जाते. अधूनमधून भुसभुशीत रण आहे. पण जीपला तेथे तसा " वांधा " येत नाही. मात्र ट्रक्स् व लॉऱ्या यांना तेथे प्रवास करणे मुष्कील होते. संरक्षण नावाची चीज आम्हाला ठाऊकच नाही. नाहीतर अफगाणिस्थान व ब्रह्मदेश हे एके काळचे हिंदू प्रदेश आम्ही का घालविले असते ? पाकिस्तान तर फार नंतर झाले. एकंदरीत, काँग्रेसची नीती व पुढारीपण या देशात

उत्कृष्ट इन्-डोअर व आौट-डोअर फोटोग्राफीसाठी संपर्क साधा

**साधना फोटो स्टुडिओ**

सोन्या मारुती चौक, लक्ष्मी रोड, पुणे २

फोन : २६४०१



'तीन तासाच्या आत लष्कर पाठवितो'
नंदासाहेबांचे अश्वासन

फार प्राचीन काळापासून दिसते. सीमाप्रांतात मोटारी प्रवास करू शकतील असे रस्ते असावेत हा संरक्षणाचा साधा नियम. रस्ते नसले म्हणजे आम्हास मिझोलँड-मध्ये धाडले त्याप्रमाणे हेलिकॉप्टरने सैन्य पाठवावे लागत नाही. खर्च वाचतो व तो पैसा इतरत्र राष्ट्रीय संपत्ती वाढविण्यासाठी उपयोगात येतो. पासष्ट साली कच्छच्या रणात युद्ध झाले. त्या आधी १९६२ साली गुजरात सरकारने खावडा ते छाड बेट येथ-पर्यंत रस्ता बांधावा अशी योजना मांडली होती. मला सांगा, पाकिस्तानने कच्छचे रण मिळविण्याचा हव्यास का धरू नये ? आणि मागून मागितले तर रणच मागितले ना ?

खरं म्हणजे पाकिस्तानचा कच्छवर डोळा १९५६ सालापासून आहे. पण आमच्या पोलिसांनी १९५६ साली पाकिस्तान्यांना छाड बेटातून भागवून लावले होते. पुढे आमचे सरकार का स्वस्थ बसले ते नेहरू व मेनन जाणे. आमचे लोकसभेतील सद-स्यही अर्थात त्याच लायकीचे आहेत. फुकट प्रवासाचा पास असून अजूनपर्यंत एकही बेटा लडाख वा नेफा वा कच्छमध्ये जात नाही ! अशा निद्रिस्त लोकसभेस दुसरी कोणती तरी चर्चा चालू असता गुलझारीलाल नंदा या गृहमंत्र्याने एप्रिल ९, १९६५ रोजी मध्येच उठून जाहीर केले, " कांजरकोट येथे पाकिस्तानी सेनेने आमच्यावर हल्ला केला आहे. " अहमदाबादेच्या अ‍ॅसेंब्लीत त्या वेळेस चर्चा झाली तेव्हा सांग-ण्यात आले, " पाकिस्तानाने आमचा एकवीस चौरस मैलांचा प्रदेश खाऊन टाकला आहे !" म्हणून " जागृत " होऊन एस. आर. पी. व सी. आर. पी. असे चारशे पोलीस गुजरात सरकारने तेथे धाडले. लोकसभा व राज्यसभा येथेही काही सभासदांनी दिल्लीश्वरांची खरडपट्टी काढली. म्हणून नंदासाहेब कच्छमध्ये हजर झाले. नंदासाहेबांनी पोलिसांना सांगितले, " तुम्ही मागितल्यावर तीन तासांच्या आत मी लष्कर धाडीन !"

९ एप्रिल रोजी १२०० पाकिस्तानी सैनिकांनी आमच्यावर जोरदार हल्ला चढविला. आमच्या पोलिसांजवळ फक्त चारच मशिनगन्स होत्या. पाकिस्तानी सैनिक दोनशे यार्डांवर येताच या पोलिसांनी गोळ्या बेफाम चालविल्या. पाकिस्तानी सैन्यास काही कळेना. चाळीस सैनिक जागच्या जागी ठार झाले! म्हणून हे पाकिस्तानी बच्चे मागे हटले. नंदासाहेबांचे आश्वासन! लष्कर मागताच तीन तासांत पाठवितो म्हणे. प्रत्यक्षात लष्करास पंधरा तास लागले येण्यासाठी. नंदांना कोठे माहिती होती कच्छच्या रस्त्यांविषयी? आमच्या पोलिसांनी पाकिस्तानी सैन्यास त्या दिवशी जे पाणी पाजले त्याला इतिहासात तोड नाही. १०० सैनिकांनी १२०० सैनिकांना हरविणे ही काही लहानसहान चीज नाही.

१९६२ साली नेफात जे घडले ते खरे म्हणजे येथे घडावयास पाहिजे होते. आमच्याजवळ शस्त्रे नव्हती. फार काय, पिण्यासाठी पाणीही नव्हते. रस्तेही खराब. अन्नधान्याचा तरी पुरवठा? तो मात्र स्थानिक कच्छी लोकांनी उत्साहाने केला. स्वत: ताक न पिता, पाणी न पिता त्यांनी या शिपायांना ते पाजले. पाकिस्तानची लष्करीदृष्टच्या तयारी किती छान होती! बदीनचा विमानतळ पळयाडला होता. कराची कँटोनमेंटहून मार्चमध्येच पाकिस्तानी सीमेवर "५१ इन्फण्ट्री ब्रिगेड" सज्ज राखण्यात आली होती. अठरा पंजाब, आठवी सीमा व सहावी बलुची बटालियन्स् त्याच्या जोडीस हजर होत्याच. या सैनिकांनी आमच्याच हद्दीत कांजरकोट व डिंग येथे ठाणीही बांधली होती. एप्रिल १० रोजी चीफ ऑफ आर्मी स्टाफ यांना कच्छ प्रदेशचा ताबा प्रकटपणे देण्यात आला. ज्या पोलिसांनी आमची अब्रू वाचविली, त्यांचे आज नावनिशाणही कोठे नाही, स्मारक तर बाजूलाच राहिले. म्हणून की काय, पाकिस्तानास एप्रिल ११ रोजी व यूनोकडे एप्रिल १२ रोजी निषेधाचे खलिते


# पुरंदऱ्यांची नौबत

ब. मो. पुरंदरे

मूल्य साडेतीन रुपये

राजहंस प्रकाशन

४१९ नारायण, पुणे २

आमच्या सरकारने "ताबडतोब" रवाना केले ! पाकिस्तानने साळसूदपणे एप्रिल १५ रोजी युद्धबंदीची विनंती केली.

आयूबखानाने अटी अशा लादल्या होत्या की दिल्लीस नाही म्हणणे भागच पडले. लागलीच एप्रिल २३ रोजी पाकिस्तानाने चार ठिकाणी (सरदार, विगरकोट, छाड, कंजारकोट) उत्कृष्ट तोफगोळा व टॅंक्स् यांच्या साहाय्याने हल्ले चढविले. भारतीय सेनेने ते सर्व हल्ले परत फिरविले. पाकिस्तानने बदीनच्या विमानतळावर F–86 या बॉम्बर्स विमानांची दोन स्क्वॉड्रन्स् सज्ज ठेवली असूनही त्या वेळेस आमच्या संरक्षण मंत्र्यांनी फारच छान कामगिरी बजावली. आपल्या समोरच्या सीमेवर जवळ जवळ एक इन्फंट्री खडी होती ! कच्छी लोकांचे "धैर्य" वाखाणण्यासारखे होते. पंजाबमध्ये तर निसर्ग स्थानिक लोकांच्या बाजूचा होता. येथे म्हणाल तर, सारे वैराग वाळवंट ! युद्धाच्या काळी रक्षकांचे रक्षण करण्यास जिद्द बहुधा आपोआपच येत असावी !!

एप्रिल ३० रोजी लालबहादुरांनी पाकिस्तानी युद्धबंदीची विनंती अमान्य केली. "पाकिस्तानास आम्ही हारवू," अशी गर्जना यशवंतरावांनी लोकसभेत करताच (स्वतंत्र पक्षाच्या काही राजाजीटाईप लोकांचा अपवाद वगळता) सर्वांनी त्यांना उचलून धरले ! एक मेस आयूबखानांनी शास्त्री यांना "आम्ही युद्ध पुकारू' अशी धमकी दिली. पाकिस्तानी नभोवाणीवरून भाषण करताना आयूबखान म्हणाले, "संरक्षण मंत्र्यासारख्या जबाबदार गृहस्थाने बेजबाबदार व साहसी वक्तव्ये करावीत हे बरोबर नव्हे." शेवटी आयूबखानांच्या मदतीस मायबाप ब्रिटिश सरकार धावले. लंडनच्या वृत्तपत्रांनी कच्छच्या लढाईची धादांत खोटी बातमी सतत द्यावी याचा लालबहादुरांना विषाद वाटला. चीनने व ब्रिटनने पाकिस्तानास "नैतिक




# कालप्रवाहात न कोमेजणारी कलात्मकता

मोहेंजोदारोच्या कारागिरांनी ५००० वर्षांपूर्वी तयार केलेल्या नर्तिकेच्या आकृतीतून तिच्या चर्येवरील आनंद, तिची चिंतामुक्त मुद्रा व लयबद्धतेचा अविर्भाव व्यक्त होतात.



धातूच्या ओतकामातील पारंपारिक कलात्मकतेचे स्वरूप समाजाच्या परिवर्तनाबरोबर बदलत राहत आले आहे. मागास जमातीतील असे कारागीर देवदेवतांच्या धातूच्या मूर्ती तयार करतात. आणि आपत्तींपासून त्या त्यांचे संरक्षण करतात असे ते मानतात. पशुपक्षांच्याही आकृत्या ते इतक्या अप्रतिम बनवितात की जणू त्या आपला जोम, आनंदी वृत्ती व शक्ती आपल्या कर्त्यांच्या प्रत्ययास आणतात.



शिल्पशास्त्रामध्ये शिल्पविशारदांना विविध देवतांची सुंदर धातुशिल्पे बनविण्यासाठी लागणारी मोजमापांची प्रमाणे दिली आहेत. आणि प्रत्येक प्रकारच्या शिल्पाकृतीसाठी स्थूल व्याप्ती आखून देण्यात आली असली तरी त्या चौकटीतूनच निर्माता कलाकार अपेक्षित जिवंत वैशिष्ट्यें प्रकट करीत असतो.

धातूच्या ओतीव कलाकृतीतून अभिप्रेत भावछटा, विविध तंत्रकौशल्ये वापरुन व्यक्त करणारे उत्कृष्ट कारागीर आजही आहेत.

अखिल भारतीय हस्तकला मंडळ

पाठिंबा " दिला तर अमेरिकेने त्यास शस्त्रे पुरविली ! या सर्व " परकीय " दडपणाखाली ' नाही हो ' करीत लालबहादुरांनी ४ मे रोजी de facto cease fire साठी आपली संमती दिली.

## प्रतिष्ठेचा प्रश्न !

आता प्रश्न असा आहे की पाकिस्तान या सव्वातीनशे मैलांच्या टापूवर खूष राहील का ? त्याने का राहावे ? फार चाणाक्षपणाने पाकिस्तानने ह्या भागात पहिल्यांदा आपल्या विश्वासाच्या मुसलमान नागरिकांना आत घुसविले. आम्ही हा भाग दलदलीचा व ओसाड असल्यामुळे तिकडे लक्षच दिले नाही. काश्मीरसाठी यूनोचे त्रयस्थ मंडळ, चीनच्या भांडणासाठी कोलंबो पॉवर्सचे मंडळ व या कच्छप्रकरणी हे नवीन लवाद मंडळ ! लक्षात ठेवण्यासारखे आहे की तीन्ही वेळा परकीयांनी चोर व साव यांना समानतेच्या भूमिकेवरून न्याय देण्याचा डांबीसपणा केलेला आहे. आम्ही होऊनच परक्या लोकांना लवाद नेमतो, पाचारण करतो. आणि म्हणतो, " निवाडा मानणे भाग आहे ! भारताच्या प्रतिष्ठेचा मांग आहे ! "

संरक्षणदृष्ट्या कच्छची आपण फार मोठी घोडचूक करीत आहोत. साधारण २०–२५ मैल कच्छी हिंदू लोक आता आपोआपच No man's land म्हणून मागे हटणार. पाकिस्तानचा गोळीबार व मुजाहिदांचा स्वैराचर आता थेट सौराष्ट्रात चालू होणार ! त्यांच्या भूमीपासून आमचे सैन्य व टेहळे खूपच दूर फेकले जाणार. आधीच आमची हेरयंत्रणा दुबळी आहे. आता तर सबब चांगलीच मिळाली ! पाकिस्तान कच्छमध्ये आला म्हणजे आमच्या आरमारास आता जास्त जागृत राहावयास पाहिजे. द्वारका व सोमनाथ या पवित्र स्थळांवर पाकिस्तानचा डोळा फार जुना आहे. या हद्दीवर चोरटा व्यापार खूपच चाले. तो आता जास्तच वाढेल. इतरही अनेक नवी दुखणी निर्माण होतील.

पण...त्याचा आता विचार नको. तूर्त कच्छ करार मान्य केल्याने अंतरराष्ट्रीय राजकारणातली आपली प्रतिष्ठा किती वाढेल इकडे लक्ष देऊ. ○


स्वादिष्ट मिठाईसाठी आम जनतेची निवड

शर्मा स्वीट मार्ट

दत्त मंदिराशेजारी, मंडई रस्ता, पुणे २.

# विचार वारे



## ☐ मॉरिशसमध्ये मराठी शिक्षण

दिनांक १२ मार्चला स्वतंत्र होऊ घातलेल्या मॉरिशसचे एक पार्लमेंटसदस्य गौतम तिलोके सध्या हिंदुस्थानात आले असून त्यांनी मॉरिशस बेटाबद्दल थोडक्यात पण नवीन माहिती दिली : "आमचा समाज बहु-वंशी, बहु-भाषी व बहु-धर्मी आहे." एकूण लोकवस्तीची वंशाप्रमाणे वर्गवारी करायची झाली तर सर्वांत अधिक भारतीय, त्यानंतर क्रिओल (एक संमिश्र वंश), नंतर चिनी व शेवटी फ्रेंच असा क्रमांक लागेल. बहुजन समाजाची भाषा क्रिओल आहे. ही भाषा म्हणजे फ्रेंचपासून तयार झालेली पण व्याकरण नसलेली एक स्थानिक बोली आहे. शाळेत फ्रेंच आणि इंग्लिशच्या जोडीला मराठी, हिंदी, तामीळ, तेलगू आणि चिनी या भाषाही शिकविल्या जातात.

तिलोके मूळचे बिहारी आहेत : "आम्ही घरात हिंदी बोलतो पण माझे भाऊ आपल्या मुलांशी क्रिओलमध्ये बोलतात. भारतीय स्त्रिया अजून साडी नेसतात पण मॉरिशसमधील बहुतेक सर्व पुरुषांनी पाश्चिमात्य पोशाख स्वीकारला आहे. खेडेगावात मूळची भारतीय असलेली मंडळी अजून धोतर नेसतात." जरी भारतीयांनी मॉरिशसमधून ब्रिटिश लोकांना बाहेर ढकलले असले तरी अजूनही सुधारलेली मंडळी आपल्या मुलांना शिक्षणासाठी इंग्लंडला पाठवितात. माझ्या एका मुलीने सहा वर्षे इंग्लिश शिक्षण घेतल्यानंतर पुढील शिक्षणासाठी मी तिला हिंदुस्थानात आणले आहे याचे काही लोकांना आश्चर्य वाटले. परंतु तिने पाश्चिमात्य व्हावे असे मला वाटत नाही. तिचा भारतीय संस्कृतीशी थोडा तरी संबंध यावा असे मला वाटते."

मॉरिशस हे जगातले "सर्वांत गोड" बेट आहे. म्हणजे येथून निर्यात होणाऱ्या मालात ९० टक्के साखर असते. मॉरिशसमधील बहुतेक सर्व लोक उसाच्या लागवडीत गुंतलेले आहेत. मॉरिशसला "डोडो पक्षाचे बेट" असेही नाव आहे. प्रारंभी या बेटावर मानवी वस्ती मुळीच नव्हती. सुरुवातीला वसाहत करणाऱ्या लोकांनी मांसासाठी डोडोची वाटेल तशी शिकार केली, त्यामुळे बदकापेक्षा आकाराने चौपट मोठा पण अगदी छोटे पंख असलेला हा पक्षी आता नष्ट झाला आहे.

## ☐ इंग्लंडमध्ये पक्ष-पालट

जगातील सर्वांत जुन्या अशा ब्रिटिश लोकशाहीला पार्लमेंट सदस्याने पक्ष-पालट करणे ही अपरिचित गोष्ट नाही, अशी माहिती परवा इंग्लंडमधील परदेशी विकास ( ओव्हरसीज डेव्हलपमेंट ) मंत्रालयाचे पार्लमेंटरी सेक्रेटरी ओरॅम यांनी भारत-भेटीत दिली. " एवढे मात्र खरे की, आमच्याकडे एकोणिसाव्या शतकाच्या मध्यास जेव्हा पक्ष-पालट झाले त्यापेक्षा तुमच्याकडे हल्ली जरा अधिक झाले आहेत." ब्रिटनमध्ये स्वतंत्र सभासदही होते, पण आता विश्वविद्यालयांसाठी राखीव जागा ठेवणे बंद झाले असल्याने राजकारणात स्वतंत्र मंडळींना स्थान राहिलेले नाही. हल्ली हिंदुस्थानात जे पक्षांचे गट निर्माण झाले आहेत त्याच्याऐवजी सुबद्ध आणि अनुशासित पक्षसंघटना तयार झाल्या की पक्ष-पालट थांबेल यात शंका नाही. हा पक्षाची शिस्त कडकपणे लागू करण्याचा प्रश्न आहे, त्याचा तात्त्विक विचाराशी फारसा संबंध नाही. " आम्ही अनेक वेळा म्हणतो की आमचे मजूर व हुजूर हे दोन्ही पक्ष बऱ्याचशा समान राजकीय विचारांचे समुदाय आहेत." " मी स्वतः 'सहकारी पक्षा'चा सभासद असून या पक्षाच्या १८ सभासदांचा गट संसदीय मजूर पक्षात संमीलित झालेला आहे."

## ☐ फॅशन कोठे जात आहे ?

आंतरराष्ट्रीय कीर्तीचे फ्रेंच फॅशन-प्रणेते लिअर कार्डिन थोड्या दिवसांपूर्वी दिल्लीला येऊन गेले तेव्हा त्यांनी फॅशनचे भविष्य वर्तविले– " येत्या उन्हाळ्यात लोक फुलांच्या डिझाइनचे प्रिंट वापरणार – स्त्रिया विरोधी रंगात फुलांच्या डिझाइनचे कपडे व पुरुषही हलक्या रंगाच्या फुलांचे डिझाइनचे सूट ! यालाच फॅशन म्हणतात, नाही का ? झपाट्याने बदलणाऱ्या आजच्या जगात फॅशनही बदलत राहिली पाहिजे. पोशाख शिवताना फक्त कापड महत्त्वाचे नसते, तर पोशाखाच्या आकारालाही महत्त्व असते. हिंदुस्थान या बाबतीत फारच पुराणमतवादी आहे. तो अजूनही परंपरेच्या वर्चस्वाखाली आहे. पण लवकरच 'वेगाचे युग' येथेही सुरू झाले की भारतीय तरुणी चिरंतन साडीला रामराम ठोकील." मग भारतीय स्त्रिया 'मिनी–साडी' नेसतील काय ? " छे छे ! साडी पायघोळच पाहिजे. त्यातच तिचे सौंदर्य व आकर्षण आहे !" फॅशन "वर" जात आहे की "खाली ?" कार्डिनचे उत्तर : " निश्चित खाली. "

## ☐ अल्प-परिचयाद् अवज्ञा ?

'अंक्टाड' परिषदेसाठी आलेल्या एका परदेशी प्रतिनिधीने एका विवाहित भारतीय स्वयंसेविकेला जरा चाचरतच प्रश्न केला–

तुला किंवा इतर विवाहित भारतीय मुलींना अपरिचित परपुरुषांशी बोलताना पाहिले तर तुमचे पती तुमच्यापाशी घटस्फोट घेतील हे खरे आहे का ? ○

# गिरी हुई... बूँद

एका घरेलू, भावनाप्रधान बंगाली हिंदी चित्रपटाला जाण्याचा बेत केला (मझली दीदी) आणि पोचलो एका भलत्याच अद्‌भुतरम्य रंगीत संगीत चित्रपटाला. ( बूँद जो बन गयी मोती) शेवटी "जो मंजूरे खुदा होता है वहीच होता है" हे खरे; एरवी या चित्रपटाची आणि माझी गाठ वस्तुत: का पडती ? चित्रपटगृहात जाऊन बसलो आणि मन भरकटू लागले.

फार मागे केव्हा तरी 'व्ही. शांताराम' हे नाव दिसले की उड्या घालून आम्ही चित्रपटगृहाच्या तिकीटखिडकीशी उन्हातान्हात रांग धरायचो. त्या काळात बहुधा आमच्या अपेक्षा पुऱ्या व्हायच्या. अपेक्षाही आजच्याइतक्या वाढलेल्या नव्हत्या, आणि या नावाने जे काही पडद्यावर दिसे तेही पुष्कळच कलापूर्ण असायचे. नंतरही वारंवार ते जुनेच चित्रपट नव्याने पाहताना त्यांतील कलेचा खूप आनंद आम्ही लुटला आजदेखील प्रसंगोपात त्यातला एखादा चित्रपट पाहण्याचा योग भेटला तर फार फार बरे वाटते. जुन्या आनंदाबरोबर नवे प्रत्यय मिळतात. सत्यजित राय आणि त्यांचे इटालियन गुरू डिसिका चित्रपट काढीत नव्हते तेव्हा पुण्याच्या व्ही

रा त रा णी

वि ज य तें डु ल क र

शांताराम नामक कलावंताने 'माणूस' नावाच्या चित्रपटात वस्तुनिष्ठ चित्रणाचे कमालीचे प्रत्ययकारी आदर्श पडद्यावर दाखवले याचा अभिमान आणि विस्मय आजही वाटतो. 'माणूस' मधली वेश्याजीवनाचे, बकाल चाळीतल्या वातावरणाचे आणि पोलिस लाइनीतील जीवनाचे चित्रण करणारी दृश्ये या घटकेलाही नजरेसमोर आहेत. प्रसंगाच्या 'मूड' शी सुसंगत अशी गती तो प्रसंग चित्रित करणाऱ्या कॅमेऱ्याला आणि चित्रणाच्या विविध प्रकारच्या तुकड्यांच्या जोडकामाला म्हणजे



संकलनाला देऊन पडद्यावर या गतीने त्या प्रसंगाला अंगचाच एक उठाव देण आज दिग्दर्शक हृषिकेश मुखर्जी फार सुरेख साधतात. पण 'शेजारी' चित्रपटात त्या जुन्या काळात 'चल चल सर्जा चल राजा रे' किंवा 'लख लख चंदेरी' नाहीतर 'सारे प्रवासी घडीचे' या भिन्न भिन्न मूड्स्च्या गाण्यांचे भिन्न गतीचे अप्रतिम चित्रण आणि जोडकाम किंवा संकलन आठवले तरी काळीज थरारते आणि म्हणावेसे वाटते, अरे हमने भी कुछ किया था !

तसे पाहिले तर खुर्चीत बसून पाहण्याव्यतिरिक्त यात आम्ही प्रेक्षकांनी काय केले ? पण आम्ही आणि 'प्रभात'. चित्र किंवा व्ही. शांताराम यांच्यात, आमच्या लेखी काही अंतरच न उरावे इतकी ही आमची अभिमानस्थाने होती. 'शेजारी' सारे दोष जमेस धरूनही रम्य होता. 'माणूस' तर अवीट होता. पुढल्यादेखील प्रत्येक 'प्रभात' चित्राशी त्यातल्या कलागुणांपुरते, व्ही. शांताराम हे नाव प्रत्यक्षात निगडित असो वा नसो, आम्ही तेच नाव गृहीत धरून बोलत असू. जे कलापूर्ण, बंदिस्त, भव्य ते व्ही. शांताराम यांचेच असे जणू समीकरण आमच्या लेखी पक्के बसले होते. पुण्यात 'प्रभात' स्टुडिओ हे त्या काळी यात्रा-स्थान झालेले होते. त्यात पोचलेले दूर-दूरचे यात्रिक 'इथे व्ही. शांताराम बसतात' असे कोणी दाखवले की क्षणभर भारावून नम्र होत. पुढे 'राजकमल' झाले. पुण्याचे व्ही. शांताराम मुंबईस येऊन बसले. 'शकुंतला' नंतर त्यांचा दबदबा वाढला परंतु आमचे जुने समाधान आम्हाला पुन्हा मिळाले नाही. उत्तरोत्तर तांत्रिक गुळगुळीतपणाच वाढत गेला आणि कला ओसरत गेली. तोवरचे पडद्यामागचे सूत्रधार व्ही. शांताराम पडद्यावर येण्याच्या भलत्या मोहाने पछाडले गेले. 'व्ही. शांताराम यांचा चित्रपट' हे वैशिष्टय जाऊन 'व्ही. शांताराम यांच्यासाठी चित्रपट' हा एक नवा कलाहीन परवल जन्मास आला. 'परछाई' काहीतरी सुसह्य होता. पण 'शकुंतला'चा नवा अवतार 'स्त्री' भयावह वाटला. एकेका चित्रपटाने 'व्ही. शांताराम' या आमच्या दैवतापासून बिचारे आम्ही एकसारखे दूरच फेकले जात शेवटी या नावाचा उल्लेखही सौजन्याने टाळू लागलो. 'इये मराठीचिये नगरी' नावाचे जे काही निघाले त्याच्या वाटेस तर आम्ही गेलोच नाही. आमची नवी आकर्षणं आता सत्यजित राय, हृषिकेश मुखर्जी, गुरुदत्त अशी वेगळी होती. ही प्रतिभावान मंडळी आम्हाला मुबलक आनंद देत होती. तरीही आमच्या आत कुठे तरी एक बोच होती. ज्यांच्या कलाकृतींवर आमची रसिकता पोसली गेली ते व्ही. शांताराम यात कुठेच नव्हते. एक वेळ ते निवृत्ती पत्करून चित्रपट–निर्मितीच करीत नसते तरी ठीक होते. पण व्ही. शांतारामनिर्मित चित्रपट तर भरपूर गाजावाजनिशी निघत होते आणि ते फार बाजारू, तकलादू आणि साच्यातील गणपतींसारखे पार गुळगुळीत होते. त्यात अव्वल कलेचा प्राणच राहिला नव्हता.

चित्रपटगृहात बसल्या बसल्या मनाच्या पडद्यावर एकीकडे हे सारे उचंबळले

होते आणि 'बूंद जो बन गयी मोती' हा चित्रपट समोरच्या पडद्यावर सुरू झाला. निसर्गसौन्दर्याने खच्चून भरलेले एक ठिकाण. नाव कोणते का असेना. तिथल्या एका शिक्षकाची गोष्ट. ('गुडबाय मिस्टर चिप्स', 'हद्दपार'...एकेक याच विषयावरच्या संस्मरणीय कलाकृती उगीच आठवू लागल्या.) खरे म्हणजे ही त्या शिक्षकाची आणि त्याच्या छत्रीचीही गोष्ट. ही छत्री वडिलार्जित संस्कारांबरोबर त्याच्या हाती आलेली. ही जुनाट छत्री हेच या शिक्षकाच्या पिढातल्या ध्येयवादी पीठाचे मूर्तिमंत प्रतीक. या शिक्षकाने शिक्षणाची नवी क्रांतिकारक पद्धती अमलात आणली. त्याबद्दल झालेला प्रखर विरोध आणि कुचेष्टा पचवली. नुकसान पदरी घेतले. अखेर लौकिक अर्थाने त्याला महत्त्व किंवा यश न मिळाले तरी एक प्रकारचे सार्थक लाभले. त्याचे विद्यार्थी मोठे होऊन देशासाठी, समाजासाठी जगू आणि मरू लागले होते. इतर कुणापाशी नसली तरी त्यांच्यापाशी या आपल्या शिक्षकाविषयी अपार कृतज्ञता होती. या कृतज्ञतेच्या प्रत्ययाने तो ध्येयवादी शिक्षक कृतार्थ झाला.

## फापटपसारा

एवढीच कथा असती तर एखादा साधा, प्रभावी चित्रपट निर्माण झाला असता. पण आमच्या भूतपूर्व दैवताचे समाधान एवढ्याने कुठले व्हायला ? या मुख्य कथेला त्याने जोडल्या दोन उपकथा. ध्येयवादी शिक्षकाने आपल्या नादान, धाकट्या भावासाठी मातेला लाजवील असा अपार त्याग केला, पण तो अंधळा त्याग होता. या त्यागाने लाडावलेल्या भावाने एका अश्राप, सुंदर, मूर्ख मुलीला फसवून तिचा खून केला आणि तो जन्मठेपेस गेला. ही एक उपकथा. यात आले भरपूर नाट्य, रहस्य, शिक्षकाच्या सोज्वळ, ध्येयवादी कथाभागात न बसणारे पाश्चात्त्य धर्तीवरचे रंगीत संगीत प्रणयप्रसंग आणि कोर्टाचे देखावे. दुसरे उपकथानक, या गडबडीत शिक्षकाची सोबत करणाऱ्या, गावातील जुनाट वस्तूंच्या दुकानाची मालकीण असलेल्या तरुण, अवखळ, अनपढ नायिकेच्या भाबड्या प्रणयाचे चाळे. याने नृत्यगायनाची आणि एका लोकप्रिय नटीच्या शरीरसौष्ठव-प्रदर्शनाची सोय झाली. तिला एक वेडपट भाऊ देऊन विनोद निर्माण करण्यात आला. मग ध्येयवादित्व, प्रचलित प्रश्नांवर भरल्या गळ्याने किंवा छातीने प्रचारकी मतप्रदर्शन, भावविवशता, रहस्य, पाठलाग, प्रणय, उत्तानता, आचरट विनोद अशा उड्या आलटून पालटून मारीत, गाण्याबजावण्याचे ताफ निमित्ताला टेकून उपयोगात आणीत, या मसालेदार चित्रपटाची निर्मिती व्ही. शांताराम या एके काळच्या कलावंताने कसबी कारागिराच्या तांत्रिक सफाईने सप्तरंगात केली. निदान पडद्यावर दिसले ते असे होते.

निसर्गदृश्यातले मनोहारी रंग सोडले तर या संपूर्ण चित्रपटात जे जे होते ते एकजात सगळे शिळे, ओशट होते. कशालाही रसरशीतपणा नव्हता. एक तर हे सारे व्ही. शांताराम यांनीच मागे त्यांच्या चित्रपटांतून वारंवार केलेले होते

किंवा इतरांच्या लोकप्रिय चित्रपटातून तरी आयात केल्यासारखे भासत होते. नवीन काहीसुद्धा नव्हते. नाही म्हणायला मुमताज आणि जितेंद्र या प्रमुख नट-नटींचे चेहरे यौवनाने फुललेले होते परंतु त्यांना दिलेली अभिनयाची चौकट वातड आणि पार बाबा आदमच्या काळातील होती. व्यक्तिरेखा नावाचे काही साकार झालेच नाही. वावरले ते ठोकळे. जे दिसले ते एका तंत्रज्ञ मनाच्या लहरींचे खेळ; ज्यात निसर्ग हा चैतन्यमय होता आणि माणसे निश्चेतन बाहुली होती. कथानक निसर्गाचे नव्हते, माणसांचे होते आणि माणसांमुळे तेही निर्जीव वाटले. संगीतात दम नव्हता. क्वचित रस होता पण कृत्रिम चित्रीकरणाने तोही बिघडला होता.

पडद्यापेक्षा प्रेक्षागृहातले दृश्य अधिक सचेतन होते—नको तेवढे सचेतन होते. चित्रपट चालू होऊन गेल्यावरही प्रेक्षक येतच होते. आलेले मधूनमधून कारणा-कारणाने बाहेर जात होते, पुन्हा रमतगमत आत येत होते. काहीजण खात होते तर काही आरंभापासून अखेरपर्यंत आपापसांत गप्पा करीत होते. चित्रपटाला उत्साहाने आलेली एक लेकुरवाळी काही कथानकानंतर तान्हे पोर मांडीवर ठेवून गाढ झोपून घोरू लागली. तिला तिच्या नवऱ्यानेच काय पण कुणीच उठवले नाही. आरंभी मन:पूर्वक चित्रपट पाहणारे तीनजण काही वेळाने थट्टामस्करी करू लागले. चित्रपटातल्या करुण जागीही त्यांना थांबावेसे वाटले नाही. पिटात कुचेष्टेच्या आरोळ्या आणि आवाज मधून मधून उठत होते. बीभत्स शेरे ऐकू येत होते. एरवी एखाद्या चित्रपटाच्या रसास्वादात एवढाही व्यत्यय येता तर माझे स्वत:चे डोके नक्कीच तडकले असते; परंतु या बाबतीत चित्रपटापेक्षा व्यत्यय वेधक ठरू लागले.

तरीही वाटत होते की हे असे व्हायला नको होते. एके काळचे आमचे दैवत असे अवमूल्यन झालेले दिसायला नको होते. असे झाले होते हे तर निखालस खरे होते.

संपूर्ण चित्रपट मी तसाच पाहिला. अनुत्सुक, अस्वस्थ मनाने; मनात गर्दी कर-णाऱ्या जुन्या चित्रपटांच्या स्मृतींचे पांघरूण वारंवार डोळ्यांवर, कानांवर घट्ट ओढून घेत. आणि विषण्ण मनाने बाहेर पडलो.

यानंतर पुन्हा काय वाटेल ते झाले तरी आपण व्ही. शांताराम यांच्या नावाने येणारा चित्रपट पाहणार नाही, अनादराने नव्हे; फार फार आदरापोटी.

आपण न पाहिला म्हणून चित्रपटाचे किंवा त्याच्या निर्मात्याचे काही अडणार नाही आहे. त्यांना त्यांचे प्रेक्षक मिळतीलच; आजचे बाजारू हिंदी चित्रपट पुन: पुन्हा पाहून दिलखूष राहणारे. त्यांना हा आणखी एक बऱ्यापैकी चित्रपट वाटेल, 'ज्युएल थीफ' आणि 'स्पाय इन रोम'हून डावा पण निदान एकदा पाहण्याला हरकत नाही—असे ते बहुधा अस्ताव्यस्त केसांची झुलपे नाहीतर गळ्याचा रंगीत रुमाल कुरवाळीत, तंग तुमानीतला एक पाय मस्तीत झुलवीत कुठल्या तरी पानाच्या ठेल्याशी उभे राहून म्हणतील. □

# प्रौढांचे बाल–नाट्य–संमेलन

२

एकोणपन्नासाव्या थोरल्या नाटच-संमेलनाचे सूप तिकडे म्हापशात वाजते तो मुंबईत एका धाकटचा नाटच-संमेलनाने 'टचंहां' केले. पहिले बाल-नाटच-संमेलन म्हणून हे वृत्तपत्रातून आणि नभोवाणीवरूनही प्रसिद्धीस आले. थोरल्याच्या तुलनेने काही कमी दिसू नये असा याचा थाट होता. उद्घाटक, स्वागताध्यक्ष, स्वागत-समिती, अध्यक्ष, विषयनियामक समिती, ठराव आणि बाल–नाटच–परिषदेची स्थापना असे सर्व थोरल्या मंडळीचे उपचार आणि सोपस्कार या संमेलनाने संभाळले. अगदी परिसंवाद आणि नाटचप्रयोगाच्या



। नरेंद्र बल्लाळ । गजानन जहागीरदार ।

[ छाया : अरुण राजदत्त ]

रीतीतदेखील हे उणे राहिले नाही. वडील नाट्यसंमेलनाच्या कामकाजात मुरलेले एक कार्यकर्ते श्री. शिवराम मोरेश्वर घैसास हे जातीनेच या वच्चा संमेलनाला उपचाराची चड्डी नेसवण्यासाठी आणि डामडौलाची जरीची टोपी घालण्यासाठी हजर होते. त्यांनी आपले काम हारतुऱ्यांच्या गणितासकट चोख संभाळले.

हे बाह्यांग सोडले तरी अंतरंगातही या संमेलनाची तब्येत आशादायक वाटली. मुलांना त्यांना पचतील, रुचतील अशी नाटके हवी आहेत. याविषयीची त्यांची भूक चांगलीच चेतली आहे. बाल–नाट्य हा केवळ पोरखेळ नव्हे हे आता जाणत्यांना मान्य झाले आहे. मुलांच्यावर संस्कार करण्यासाठी माता–पिता चरितार्थाच्या खड-तर उद्योगापायी उपलब्ध नसतां आणि शालेय जीवनाच्या पुस्तकी गर्दीत मुलांची भुकेली मने तृप्त होण्याऐवजी रोज घुसमटत असता, बाल–नाट्याचे माध्यम विद्य-मान बाजारी रंजनप्रकारांपेक्षा अधिक उजवे माध्यम आणि संस्कारांसाठी एक रंजनप्रधान शाळा म्हणून उपयुक्त ठरण्यासारखे आहे, हा दृष्टिकोन अधिकाधिक मान्य होत आहे. तरीही आजदेखील एखाद्या पुण्यपत्तनस्थ शाळेचा अपवादात्मक चालक 'यापेक्षा कुस्त्या नाही तर जादूचे प्रयोग तुम्ही का नाही करीत ? मुलांना नाटके दाखवण्याच्या मी विरुद्ध आहे' असे 'बालनाट्य' संस्थेचे सूत्रचालक रत्ना-कर मतकरी यांना ठणकावून सुनावतोच. संमेलनाच्या परिसंवादात मतकरींनी हा किस्सा सांगितला. असे तुरळक अपवाद सोडले तर बाल–नाट्याची चळवळ अधिक योजनाबद्धपणे आणि सुसूत्रपणे, बाजारी मोहांच्या आहारी न जाता महाराष्ट्रात निकोपपणे वाढली तर ती सर्वांनाच आज फार हवी आहे. या अनुकूल परिस्थितीत महाराष्ट्रात या प्रकारची नाटके करणाऱ्या व्यक्तींनी आणि संस्थांनी एकत्र येण्याचे मनावर घेणे हे अगदी नैसर्गिकपणे आणि अपरिहार्यपणे घडल्यासारखे वाटले. मुंबईतील आणि मुंबईबाहेरील शालेय क्षेत्रातल्या बाल–नाट्य पुरस्कर्त्यांनीही या संमेलनात हक्काने हजरी लावून आणि सक्रिय भाग घेऊन या चळवळीतले शालेय रंगभूमीचे स्थान सिद्ध केले. काही पालकही हजर होते. थोरल्या नाट्य-परिषदेतर्फे श्री. अंधृटकर सदिच्छा बरोबर घेऊन येऊन पोचले तर श्री. भालचंद्र पेंढारकर आणि श्री. गजानन जहागिरदार या नाट्य आणि चित्रपटव्यवसायातील बुजुर्गांनी वेग-वेगळ्या निमित्तांनी संमेलनाला जातीने हातभार लावला. उद्घाटन बाल–नाट्याचे वैदर्भीय प्रणेते श्री. पुरुषोत्तम दारव्हेकर यांनी केले.

आरंभापासून अखेरपर्यंत या छोट्या संमेलनाला वैयक्तिक वा व्यावसायिक हेवे-दावे किंवा दिखाऊ आणि कोरड्या औपचारिकतेचा वारा लागला नाही हे आश्चर्य मुद्दाम नमूद करण्यासारखे आहे. प्रत्येक गोष्टीत मनःपूर्वकता होती. उत्साह होता. खेळीमेळी होती. परिसंवाद वाहवले, क्वचित कंटाळवाणेही झाले (हे परिसंवादांच्या परंपरेला धरूनच !) परंतु एखादा अपवाद वगळता प्रत्येक बोलणाराच्या शब्दात बऱ्यावाईट वक्तृत्वापेक्षा तळमळ होती. दोन परिसंवादांत मिळून बाल-नाट्याच्या

चळवळीचे प्रश्न आणि स्वरूप अशी दोन्ही पुष्कळच स्पष्ट झाली. ही चळवळ जोपासली पाहिजे हे तसे वादातील असले तरी तिने कोणुता मार्ग पत्करावा याविषयीची भिन्न मतेही उघड झाली. शिक्षणक्षेत्रातल्या मंडळीला या चळवळीने राष्ट्रप्रेमाचे आणि आज राष्ट्राला आवश्यक असलेल्या गुणांचे आरोपण व पोषण मुलांमध्ये करावे असे वाटते. बाल-नाटयाच्या संस्था चालवणाऱ्या तरुण मतकरी-करमरकरांनी ही जबाबदारी नाकारून मुलांना प्रगल्भ आणि सुसंस्कृत नागरिक बनवणे एवढयाच मर्यादेत या चळवळीने आपली निखळ रंजनप्रधानता संभाळून झटावे असे सांगितले. परिसंवाद 'निकाली' नसल्याने हे मतप्रवाह स्पष्ट झाले तरी वसास लागले नाहीत. पुढील काळात या दोन्ही मार्गांनी ही चळवळ वाढविण्याचे प्रयत्न होत राहतील असे दिसते. संस्थांच्या स्वरूपातील बालरंगभूमी प्रामुख्याने रंजनावर भर देईल तर शालेय रंगभूमीवर बोधपर नाटके येत राहतील. (ती कमी रुक्ष असावीत एवढी किमान अपेक्षा.) बाल-नाटयासाठी भुकेली असलेली पोरे दोन्ही, सारख्याच उत्साहाने पाहतील आणि जे आवडेल ते चड्डया सावरीत मनातून घरी घेऊन जातील.

## गैरवाजवी मुद्दे

बाल-नाटय म्हणजे मुलांनीच करण्याची नाटके की प्रौढांनीही मुलांसाठी करण्याची नाटके आणि बाल-नाटयात नेपथ्य किती आणि कसे असावे हेही, परिसंवादात उमटून गेलेले वादाचे दुय्यम महत्त्वाचे मुद्दे. वस्तुतः बाल-नाटये जोवर निखालसपणे मुलांसाठीच केली जातात आणि ती रंजन करतात तोवर ती कोण व कशी करते हे मुलांच्या दृष्टीने तरी गैरवाजवी मुद्दे होत. शास्त्रीय आणि तांत्रिक वितंडवाद करून एखाद्या गोष्टीतला रस घालवण्याची खोड माणसाला लागते ती पुढे प्रौढ वयात. बालपण निष्पाप असते.

आजच्या बालरंगभूमीचा भर अक्षरशः बालांवर असून कुमारवयातल्या मुलांकडे दुर्लक्ष होत आहे असा इषारा एका मुख्याध्यापकांनी एका परिसंवादात दिला. तसेच बाल-नाटयाच्या लेबलाखाली नाटय नसलेले अनेक कौतुकप्रधान किंवा उत्साहपर बालिश उपक्रम गावोगाव पोरांच्या माथी मारले जात आहेत, इकडे अनेकांनी बाल-नाटयाविषयी तळमळ बाळगणारांचे लक्ष वेधले.

बालरंगभूमीचे म्हणून जे प्रश्न या संमेलनात उल्लेखिले गेले त्यांविषयी श्री. भालचंद्र पेंढारकर परिसंवादाच्या अध्यक्षपदावरून म्हणाले, 'हे सारे मी आज प्रथम ऐकतो आहे असे मला वाटलेच नाही. गेली अनेक वर्षे मोठया नाटय-संमेलनात आणि नाटय-परिषदेत हेच प्रश्न न चुकता चर्चिले जात आहेत.' नाटयगृहांची तुटपुंजी उपलब्धता, त्यांची महाग भाडी, जाहिरातखाती होणारा अवाच्या सवा खर्च असले बाल-नाटय-संमेलनापुढचे व्यावहारिक प्रश्न खरोखरीच 'वरीलबरहुकूम' होते. फरक एकच- थोरल्या रंगभूमीला तिच्या धंदेवाईक, अस्ताव्यस्त आणि

विघटित अवस्थेमुळे यातून सुटण्याचा त्वरित मार्ग उपलब्ध नाही. बालरंगभूमी विषयी एक तर, आज तरी सर्वत्र एक प्राथमिक सहानुभूती आहे. तिचे स्वरू फारसे व्यापारी होऊ शकत नसल्याने आणि विस्तार अनावर नसल्याने तिला य प्रश्नातून एका योजनापूर्वकतेने सुटका साधता येईल. मात्र यासाठी संमेलना दिसलेला एकोपा आणि उत्साह मतभेद राखूनही यानंतर टिकला पाहिजे.

तसेच ही केवळ मुंबई, पुणे, नागपूरसारख्या मोठ्या शहरांतील सुखवस्तू वर्गा तल्या मुलांसाठी चालणारी चळवळही राहता कामा नये. शहरातल्या गरीब मुलांन आणि खेड्यापाड्यांतल्या पोराबाळांना जेव्हा ही बाल–नाट्ये दिसू लागतील तेव्ह या चळवळीने खरे या मातीत मूळ धरले असे मानता येईल.

## मुलांचा आनंद हाच निकष

पहिल्या दिवशी हे संमेलन अत्यंत गंभीरपणे चालू होते आणि सभागाराच्या बाहे जवळपासच्या वसतीतली दोन छोटी पोरे, रस्त्यावरचा बाल–नाट्य–संमेलनाच रंगीबेरंगी फलक वाचून की काय, हळूच बुजरेपणाने आत डोकावली. आपल्याशीच जिव्हाळ्याने संबंधित असे काही इथे चालले आहे असे त्यांना सभागारातले लांब लांब चेहरे पाहून आणि अवघड अवघड इंग्रजी, मराठी शब्द ऐकून वाटले नसावे किंचित्काळ तशीच बुजून ती दाराशी घोटाळली. मग उत्सुक नजरांनी आस्ते आस्ते आत सरकली आणि तेवढ्यात त्या बाजूच्या एका जागरूक कार्यकर्त्याने पाखरं हुसकावीत तसे हलक्या आवाजात केले, श्श्श्श्श्– !

त्यासरशी चुकूनच बाल-नाट्य-संमेलनात येऊन पडलेले ते दोन बालजीव सुर्रर् दिशी पार बाहेर निघून गेले.

पुन्हा संमेलन संपेपर्यंत ते तिकडे फिरकले नाहीत.

बाल-नाट्याचे स्वरूप, अडचणी आणि भवितव्य यांची चर्चा झाली. ठराव झाले परिषदही स्थापन झाली. तिचे पदाधिकारी नियुक्त झाले. आता आम्ही, बाहेर ठवलेल्या त्या छोट्या रसिक प्रेक्षकांना मानाचे निमंत्रण दिले पाहिजे. परिषदेच्या अप्रत्यक्ष परंतु निश्चित नियंत्रणाखाली सुंदर सुंदर धमाल नाटके सर्वभर या बच्चे-लोकांसाठी नाट्यगृहांतून, जुजबी नाट्यगृह बनवलेल्या सभागृहांतून, मांडवातून, शाळांच्या पटांगणांतून नाहीतर गच्च्यांवर आणि चाळींच्या चौकाचौकांत झाली पाहिजेत. याआड येणाऱ्या एकूणएक अडचणी सोडवल्या गेल्या पाहिजेत. बाल–नाट्ये मोठ्या नटांनी करावीत की लहान नटांनी, नेपथ्याचा थाटमाट असावा की नसावा, हे प्रश्न यानंतर तिथेच सुटतील. पोरे खूष झाली पाहिजेत एवढा एकमेव निकष !

बाल–नाट्य–परिषद हे करू शकली नाही तर हे पहिले बाल–नाट्य–संमेलन म्हणजे प्रौढ उत्साहाचे एक बाल–नाट्य ठरेल.

O

अल्पावधीत लोकप्रिय झालेली

# स्वस्तिक

## पादत्राणे




आकर्षक रंग

लेटेस्ट डिझाईन्स

टिकण्यास मजबूत

**स्वस्तिक रबर प्रॉडक्टस् लि., पुणे ३.**

शंकर इनामदार

# मी हरलो ? छे ! मी जिंकलो !!

सुलूनं दिलेल्या यादीप्रमाणं साऱ्या वस्तू खरेदी करून झाल्या होत्या. तिच्यासाठी एक मोगऱ्याच्या कळ्यांची वेणी आणि तिला आवडणारी काळी टपोरी जांभळं पण विकत घेतली होती. दादरला आलं की मामा काण्याचा बटाटावडा सहसा चुकवीत नसे मी. सुलूही बटाटेवडे छान करते. ते वडे मी आवडीनं खातोही. पण तिच्या बटाटेवडयांत आणि मामा काण्याच्यां बटाटेवडयांत खूप फरक असतो. काही काही हॉटेलवाल्यांची स्पेशॅलिटी असते. त्या पदार्थांची मट्टी त्यांना साधून गेलेली असते. सारं ब्रह्मांड फिरून आलं तरी तसा पदार्थ दुसरीकडं कुठं मिळायचाच नाही. पानवाल्यांचंही तसंच असतं. त्यांची गिऱ्हाइकं सर्वसाधारणपणे ठरलेलीच असतात. पुण्याला असताना सुरुवातीला मी माझ्या मामाकडे जोगेश्वरीच्या बोळात राहात असे. जेवण करून बाहेर पडलं की प्रथम माझी सायकल लक्ष्मीरोडवरून डावीकडच्या गेस्टहाऊसकडे वळत असे. गेस्टहाऊसच्या तोंडाशीच तो पानवाला भैय्या आहे. सायकलवरून न उतरताच फूटपाथला पाय लावून मी उभं राहायचं आणि भैय्यानं झटपट पान लावून द्यायचं. अरूच्या पुण्यात तसं पान कुठं मिळायचं नाही. दिवसातून तीनचार वेळा तरी माझी सायकल गेस्टहाऊससमोर थबकायची. ते एक जबर व्यसनच लागलं होतं मला. इतकं की, पुढं लग्न झाल्यावर दारूवाला पूलाजवळ मी माझं वेगळं बिऱ्हाड थाटलं तरी केवळ त्या पानासाठी वाकडी वाट करून गेस्ट-



आणि खतांचे एकूण उत्पादन–तेहतीस कोटी.
तेहतीस कोटी उत्पादनात बावीस कोटींचा परकीय हिस्स
गेल्या दोन वर्षांतच
रासायनिक खतांच्या आयातीसाठी
आम्ही सुमारे दोनशे कोटी रुपये खर्ची घातले.
निर्यात करून सबंध वर्षात जेवढे परदेशी चलन
आपण कमावतो त्याच्या चाळीस टक्के भाग
केवळ खते आणि धान्य यांसाठी आपल्याला
खर्च करावा लागतो.
आणि १९७०–७१ साली
म्हणे
आपण अन्नाच्याबाबतीत स्वावलंबी होणार!
यासाठी प्रयत्न अगदी वेगळ्या दिशेनेच
सुरू व्हायला पाहिजेत.
सोनखत, शेणखत, मूत्रखत, पाल्यापाचोळ्यापासून हे
कंपोस्ट खत
आज प्रचंड प्रमाणावर खेड्यापाड्यातून वाया जात आहे.
केवळ पूर्वग्रह
अस्वच्छतेची भावना
यामुळे ही खते वापरली जात नाहीत.
रासायनिक खते सर्वसामान्य शेतकऱ्यापर्यंत पोचतील
तेव्हा पोचतील.
तोपर्यंत ही वाया जाणारी नैसर्गिक खते
कशी गोळा करावयाची
याचे शास्त्रशुद्ध शिक्षण शेतकऱ्यांना दिले गेले
तर दहा टक्के अन्नाची तूट भरून येणे
मुळीच अवघड नाही.
पण हे करणार कोण!



## आमचे जोशीबुवा हे करीत होते....


एक सर्वोदयी कार्यकर्ते
शेवगावला अन्नसंचलनात दाखल झाले
आणि त्यांनी संचलनाच्या सोनखत
गोळा करण्याच्या कार्यक्रमाला
एक वेगळीच बैठक प्राप्त करून दिली.
जिथे जमेल तिथे
गावकऱ्यांच्या भावना न दुखवता

सोनखत गोळा होत होते.
पैठण ते नेवासे हे बरेच नियमितपणे जमले.
छोट्या–मोठ्या सभातून
अशा मार्गानेच आपला अन्नप्रश्न सोडवला पा
यावर लोकांमध्ये एकमत होत होते.
पैठण सोडले
आणि पहिला मोठा मुक्काम



## शेवगाव

सरपंच श्री. भाऊसाहेब ढाणगे



## जोहरापूर

रात्री एक वाजेपर्यंत रंगलेली चर्चा.



## भायगाव

दिवसभर कार्यक्रमांची गर्दी.





# कुकाणा

दुपारी विद्यार्थ्यांसाठी कार्यक्रम.



भेंडे

परदेशी अन्नमदत ताबडतोब थांबली पाहिजे.
ठराव एकमताने मंजूर.



मानसचित्रं

डॉ. करेशिया आदी मित्रपरिवार



**तुझी. मला तू हवा होतास, शाम–**

हाऊसच्या दाराशी दिवसाकाठी निदान एकदा तरी जाऊन धडपडायचो. नंतर माझी बदली मुंबईला झाली आणि नाइलाजानं पानतोड झाली. पुण्याला जसं ते पानाचं तसंच मुंबईला हे बटाटेवड्याचं व्हायला लागलंय. मुद्दाम या वड्यासाठी जरी मी घाटकोपरहून दादरला येत नसलो तरी काही ना काही निमित्तानं इकडे आलं की, तो वडा घशाखाली घातल्याशिवाय चैनच पडत नाही.

–हॉटेलात गर्दी बरीच होती. पुष्कळांच्या पुढ्यात बटाटेवडेच होते. माझ्यासारखे 'वडे–वेडे' लोक बरेच असल्याचं पाहून जरा बरं वाटलं. बोळकंडीतून वाट काढीत मी मागच्या बाजूच्या प्रशस्त आवारात दाखल झालो. तिथंही हाऊसफुल होतं. डाव्या बाजूच्या छोट्याशा टेबलाशी एक जोडपं आणि समोरच्या बाजूला त्यांचा गुटगुटीत गोट्या वडे खात बसले होते. गोट्याजवळची खुर्ची रिकामी होती.

"इफ् यू आर नॉट् डिस्टर्ब्ड प्लीज्–" मी मोठ्या अदबीनं टायवाल्या मिस्टरांना वचारलं.

"यू आर वेलकम्" गृहस्थ स्मित करीत म्हणाला.

"थँक्स्" मी आभार मानले आणि ऑर्डर घेणाऱ्या भरघोस मिशीवाल्या बंडोपंतांचा शोध घेऊ लागलो.

"अय्या ! शाम ?"

तो ओळखीचा आवाज ऐकून मी चमकलो. समोरच्या खुर्चीकडे माझी नजर वळली.

"नंदू !"

क्षणभर आम्ही दोघं एकमेकांकडे पाहातच राहिलो. अशी आकस्मिकपणे झालेली भेट आम्हां दोघांनाही अकल्पित योगायोगाची वाटत होती. एकाएकी भानावर येत नंदूनं शेजारी बसलेल्या मिस्टरांकडे पाहिलं आणि ती म्हणाली—

"बरं का हो, ओळख करून देते तुमची. मागं मी तुम्हांला माझ्या एका मैत्रिणी-बद्दल सांगितलं होतं ना ? —त्या शोभा मुजुमदारविषयी ?"

"हो हो, म्हणजे ती रेडिओवर गात असे तीच ना ?"

"होय तीच. दोन अडीच वर्षांपूर्वी वर्तमानपत्रात छापून आलेला तिचा फोटोही दाखवला होता मी तुम्हांला."

"आठवतं मला. मला वाटतं त्या वेळी त्यांचं लग्न झाल्याबद्दलची बातमी होती.'

"बरोबर आहे." मी मधेच म्हणालो—"ती शोभा माझी धाकटी बहीण."

"आय्. सी. म्हणजे ननीची आणि तुमची जुनी ओळख आहे. व्हेरी ग्लॅड् टू मीट यू मिस्टर—"

"शाम मुजुमदार" मी नाव सांगितलं.

"शाम मुजुमदार. शाम—नाव परिचयाचं वाटतं."

"नावाचा परिचय असणं शक्य आहे," मी म्हटलं—"साहित्याचा सेवक आहे मी. माझ्या लघुकथा निरनिराळ्या मासिकांतून अधूनमधून प्रसिद्ध होत असतात. शिवाय चारपाच पुस्तकंही प्रकाशित झालेली आहेत माझी."

"अगदी बरोबर ! तुमचं साहित्य वाचनात आलंय माझ्या. फार छान लिहिता तुम्ही. फार आनंद झाला तुमची ओळख झाल्याबद्दल. नने, तुला तर वाचनाचा खूप नाद आहे. या शामरावांविषयी कधी बोलली नाहीस तू मला."

"मीही वाचल्या आहेत यांच्या कथा. पण खरं सांगू का ? मला वाटत होतं की लेखक शाम मुजुमदार ही व्यक्ती निराळी असावी. लेखक शाम आणि शोभाचा भाऊ शाम ही एकच व्यक्ती आहे याचा उलगडा मला आज झाला." नंदूनं माझ्याकडे कौतुकानं पाहात म्हटलं, "लेखक हा नवा अवतार यांचा !"

"त्या अर्थानं आपली ही नवी ओळख समजायला हरकत नाही." मी म्हटलं.

"म्हणजे माणूस बदललं नाही. त्या माणसाचा एक वेगळा आविष्कार पाहायला मिळाला." नंदू हसून म्हणाली.

"माझीही नेमकी तीच स्थिती झालीय" मी म्हटलं—"नंदू गोरेची रूपांतरित आवृत्ती पाहायला मिळते मला."

"अय्या, आमची ओळख करून द्यायची राहिलीच की, हे मिस्टर अजित लाड. सेंट्रल रेल्वेच्या कमर्शियल डिपार्टमेंटमध्ये असतात. हा राजू. नुकतीच शाळेत जायला

सुरुवात केलीय स्वारीनं. आणि मी—माझं नाव ठाऊकच आहे तुम्हांला."

"माहेरचं आहे ठाऊक. रूपांतरित नाव कळायचंय अजून."

"तिच्या नावात बदल केलाच नाही आम्ही," अजित मध्येच म्हणाले– "सौ. नन्दिनी लाड याच नावानं मतदान करते ती. तसा मी तिच्या नावाचा शॉर्ट फॉर्म केला आहे. नावातलं मधलं अक्षर गाळून मी तिला फक्त ननी म्हणतो."

"तुम्ही काय घेणार?" टेबलाशी येऊन उभ्या राहिलेल्या ऑर्डरवाल्या बंडोपंतांकडे पाहात नन्दिनीनं मला विचारलं.

"एक वडा आणा" मी बंडोपंतांना ऑर्डर दिली, ऑर्डर घेऊन बंडोपंत निघून गेले. अजित आणि नन्दू दोघंही माझ्याकडं पाहून हसले. मी काहीसा गोंधळलो. माझी ती स्थिती पाहून नन्दिनी म्हणाली–

"आता या वड्याविषयीच वाद चालला होता आमचा."

"वाद?"

"होय. यांची आणि माझी बेट लागलीय आज."

"बेट? म्हणजे—पैज?"

"होय. याच्यापेक्षा चवदार बटाटेवडा घरी करून दाखवला तर एक फुलवायलचं पातळ घेऊन देणार आहेत हे मला."

"खात्री वाटते तुम्हांला पैज जिंकण्याची?"

"सेंट परसेंट. उद्या संध्याकाळीच करणार आहे मी वडे."

"पंच म्हणून तुम्ही हजर राहा उद्या. संध्याकाळी जेवायलाच या आमच्याकडे. आठसाडेआठपर्यंत आलात तरी चालेल. शामराव देतील तो निकाल मान्य करायचा नने."

"तुमच्या मियाबिबींच्या वादात मला कशाला ओढता उगीच?" बंडोपंतांनी आणून ठेवलेल्या वड्याचा तुकडा तोंडात टाकीत मी म्हणालो.

"मी विचारच करीत होते तुम्हांला घरी बोलवण्याचा. अनायासे यांनी पंच म्हणून तुमचीच निवड केली हे छानच झालं. आलंच पाहिजे उद्या. राहायला कुठं असतां?"

"घाटकोपरला."

"अय्या, मग लांब नाही. आम्ही चेंबूरलाच असतो. टाऊन शिप कॉलनी."

"हा घ्या पत्ता" एक व्हिजिटिंग कार्ड काढून अजितांनी माझ्यापुढं ठेवलं.

"वहिनींना घेऊन या ओळख होईल या निमित्तानं. बाबा लोक कुणी असतील, तर त्यांनाही आणा बरोबर."

"आपण चहाच घेणार ना?" ऑर्डरवाले बंडोपंत पुन्हा येऊन उभे राहिले होते. त्यांच्याकडे पाहात अजितांनी विचारलं.

"होय."

" तीन चहा " अजितांनी ऑर्डर दिली आणि माझ्याकडे पाहात ते म्हणाले- " आपण सर्व्हिसला कुठं असता ? "

" रिझर्व्ह बँकेत अकौन्टस् डिपार्टमेंटमध्ये आहे मी. "

" बँकेतल्या नोकरांचा हेवा वाटतो मला. "

" तो काय म्हणून ? "

" सुट्ट्या भरपूर. आम्हांला रविवारीसुद्धा जावं लागत. मग सुट्टीची गोष्टच नको. "

" आणि सकाळी आठाला बाहेर पडतात ते रात्री आठाला घरी म्हणजे फक्त जेवायला अन् झोपायलाच म्हणानात. "

" मुंबईतल्या बहुतेकांची हीच स्थिती असते. नाइलाज आहे त्याला. " मी म्हटलं.

" मला तर बाई अजिबात आवडत नाही ही मुंबई. वेळ घालवायला दुपारचं कुठं जावं म्हटलं तर त्या लोकल गाड्या अन् बसेसकडे पहिलं की जीव दडपतो. अन् हा रखरखीत उन्हाळा– "

" यंदा कहरच केलाय उन्हाळयानं " मी म्हणालो.

" अहो दरवर्षी असंच म्हणत असतो आपण. आणि आपले दिवस ढकलीत असतो. " अजित म्हणाले.

चहा घेऊन आला होता. बंडोपंतांनी बील आणून ठेवलं होतं. पाचाची नोट काढून चटकन मी त्या बशीत टाकली.

" अरे अरे, हे काय ? तुम्ही कशाला ? यू आर् अवर गेस्ट. "

" छे छे, गेस्ट म्हणून उद्या येणार आहे मी. "

" गेस्ट म्हणून नव्हे. पंच म्हणून. निवाडा करायला, " नन्दूनं पुन्हा एकदा माझ्या उद्याच्या भूमिकेची मला जाणीव करून दिली.

बंडोपंतांनी बाकी राहिलेले पैसे आणून ठेवले ते खिशात घालीत मी उठलो. आम्ही दादरच्या प्लॅटफार्मवर येताक्षणीच कुर्ल्याची गाडी आली आणि ती दोघं आणि राजू त्या गाडीतून निघून गेली.

– नन्दूला मी विसरलो होतो. तिला विसरण्यासाठी महान तपश्चर्या करावी लागली होती मला. ती दृष्टिआड व्हावी म्हणून नगर सोडून पुण्याला मामाकडं येऊन राहिलो होतो मी. नन्दूच्या आठवणीनं बेचैन होणाऱ्या मनाला वाङ्मय साहित्याची फूस लावून त्यात त्याला गुंतवून ठेवीत होतो. चर्चामंडळ, व्याख्यानं, हौशी कलावंतांची नाट्यमंडळं वगैरे सामाजिक संस्थांच्या कार्यक्रमात भाग घेऊन मनाला दुसरा कसलाच विचार करायला अवसर मिळू देत नव्हतो. नाटकातल्या माझ्या भूमिका उत्कृष्ट होत. त्याबद्दल मला वैयक्तिक बक्षिसं मिळाली आणि त्या वातावरणातच सुलभा पांडेची आणि माझी ओळख झाली. सुलभा आकर्षित झाली, परिचय वाढला आणि त्याचं पुढे प्रेमात रूपांतर झालं. पाटीवरचं एक चित्र पुसून

दुसरं काढावं तसं मन:पटलावरचं नन्दूचं चित्र पुसलं जाऊन सुलूचं रेखाटलं गेलं. आणि त्या चित्रावर विवाहाची सोनेरी चौकट बसली.

काळे वकिलांची माली, डॉक्टर रानड्यांची शकू, गोरे मामलेदारांची नन्दू आणि आमची शोमा ही मैत्रिणींची चौकडी नगरामध्ये एक कुतूहल होतं. देखणेपणात एकीपेक्षा एक सुंदर होती. चौघीजणी एकत्र आल्या की ताज्या टवटवीत फुलांचा गुच्छ बांधल्यासारखं वाटायचं. हसायला लागल्या की छोट्या छोट्या घुंगरांचे चाळ पायात बांधून कुणी नर्तनाला सुरुवात केल्याचा भास व्हायचा. समईत तेवणाऱ्या चार ज्योतीसारख्या त्या आल्हाददायक वाटायच्या. गुच्छात गुलाबाची टपोरी कळी अधिक खुलून दिसावी. चाळांतल्या घुंगरांत एखाद्याचाच किंचित वेगळा पण सुमधुर आवाज यावा किंवा समईतल्या चार ज्योतींत एखादीच किंचित अधिक प्रज्वलित भासावी तशी नन्दू त्या चौघीजणीत अधिक खुलून दिसायची. अधिक रमणीय वाटायची. अधिक तेजस्वी भासायची. नंन्दूनं माझ्या हृदयात असंख्य प्रीति-ज्योती पेटवल्या होत्या. हृदयगाभाऱ्यातल्या त्या शीतल प्रकाशात तिची मनोहर मूर्ती उजळून निघाली होती. त्या तेजस्वी मूर्तीचं अखंड पूजन माझ्या हृदयमंदि-रात चालू होतं. त्या उन्मादक सौंदर्यानं मी वेडा होऊन गेलो होतो. नन्दूखेरीज मला काहीच सुचत नव्हतं. तो एकच ध्यास मनाला लागून राहिला होता. नन्दूला एकटीला गाठावं. तिच्यासाठी झुरत राहणारं मन तिच्याजवळ उघडं करावं. हृदय खुलं करावं. आतल्या त्या असंख्य ज्योतींचा प्रकाश तिचे डोळे दिपवील. त्या प्रकाशात तिच्या मादक नेत्रातलं पाणी चमकेल. भावपूर्ण चेहऱ्यावर उमटलेल्या मंद प्रीतिलहरी स्पष्ट दिसतील. या कल्पना उराशी बाळगून मी तिच्या एकान्त भेटीची संधी मिळविण्याची धडपड करीत होतो. ज्योतीवर झडप घालायला हपापलेल्या पतंगासारखी माझी स्थिती झाली होती. पण ज्योत आणि पतंग यांमध्ये एखाद्या कंदिलाच्या काचेसारखी शोभाताई सतत उभी होती. मला हवी होती ती संधी मिळणं अशक्य होऊन बसलं.

– त्या झळा मला स्वस्थ बसू देत नव्हत्या. शोभाताईजवळ या गोष्टीची वाच्यता करणं मला प्रशस्त वाटेना. अखेर मी निश्चय केला. परिणाम काय होईल याची खंत न बाळगता नन्दूला मी एक प्रेमपत्र लिहिलं. जितक्या भावपूर्ण शब्दांत व्यक्त करता येणं शक्य होतं तितक्या तीव्रतेनं तिला माझे विचार कळवले. ते पत्र मी तिच्या नावाने तिच्या घरच्या पत्त्यावर पोस्टानं पाठवून दिलं. त्या पत्राचं काही तरी उत्तर येईल किंवा नन्दूबद्दलचा आपला अडाखा चुकला असला अगर आपली पायरी सोडून आपण वागलो असलो तर त्याचे दुष्परिणाम म्हणून शोभाताई आपली खडसावून कानउघाडणी करील असे अंदाज मी बांधले होते. पण माझ्या अंदा-जातल्या दुष्परिणामापेक्षाही विपरित गोष्ट घडली. शोभाताईकडे नन्दू पुन्हा कधीच आली नाही. मैत्रिणींची ती चौकडी तेव्हापासून कायमचीच फुटली. माझं पत्र

बहुधा मामलेदारसाहेबांच्या स्वतःच्याच हातात पडलं असावं. आणि माझ्या आततायीपणाबद्दल बिचाऱ्या नन्दूला निष्कारण वडिलांची बोलणी खावी लागली असतील. ही गोष्ट शोभाताईला कळली का नाही ते समजलं नाही. कारण शोभाताईच्या तोंडूनही त्याबद्दल चकार शब्दही कधी निघाला नाही. स्वप्नातून मी जागा झालो होतो. नन्दू माझं स्वप्न होतं. जागेपणी फिरून न दिसलेलं.

ते स्वप्न फिरून दिसलं नव्हतं तरी त्याची आठवण कायम होती. त्या चौकडीनं त्या वेळी काढून घेतलेल्या ग्रूप फोटोची एक प्रत माझ्या जवळ होती. शोभाताईच्या पेटीतून झक्कपैकी चोरून घेतली होती ती मी. शोभाला दिसू नये म्हणून माझ्या एका पुस्तकाच्या पोटी दडवून ठेवली होती. जोगेश्वरीच्या बोळातल्या मामाच्या घरून निघून दारूवाला पुलाजवळ ज्या वेळी आम्ही वेगळं बिऱ्हाड थाटलं त्या वेळी माझ्या ट्रंकेतील पुस्तकं बाहेर निघाली. घर लावायचं काम स्वतः सुलू करीत होती. शेल्फवर पुस्तकं लावताना तो फोटो पुस्तकाबाहेर डोकावला. फोटोतली शोभा सुलूच्या ओळखीची होती. इतर तिघींबद्दल मी तिला सांगू लागलो. नन्दूविषयी बोललो त्या वेळी अकल्पितपणे माझ्या आवाजाला कंप सुटला. बायका चतुर असतात. काही काही गोष्टी न बोलताही त्यांना कळतात. नीतिमान स्त्रियांनी केलेले अंदाजही अचूक असतात.

"विशेष आपुलकी असलेल्या माणसाविषयी बोलताना असंच होतं नाही ?"

"कसं ?"

"शब्दांच्या ओघात अडथळे निर्माण होतात."

"कसले अडथळे ?"

"स्मृतींचे."

"कसली स्मृती ?"

"मनाला विचलित करणाऱ्या प्रसंगाची."

"तू काही तरीच बोलतेस. असा संशय का वाटतो तुला ?"

"आणखी एक चित्र दाखवते तुम्हाला."

"कसलं ?"

खुंटीला टांगलेली हॅन्डबॅग तिनं आणली. घडी केलेला एक कागद तिनं त्यातून बाहेर काढला. घडी उलगडून तो कागद तिनं माझ्या समोर धरला. कागदावर चित्र नव्हतं-मजकूरही नव्हता. अक्षरांची निरनिराळी वळणं घेऊन तीन-चार ठिकाणी मी नाव लिहिलं होतं 'नन्दू' – 'नन्दिनी' – 'NANDU'

"काय आहे हे ?" मी चाचरत विचारलं.

"चित्र."

"थट्टा करतेस तू."

"थट्टा नव्हे. पुरावा दाखवते आहे."

" वेडी आहेस."

" मी वेडी कशी? इथं तुमचं वेड बाहेर पडलं आहे. ज्या नन्दूचं नाव तुम्ही या कागदावर लिहिलं आहे तिच्यासाठी तुम्ही वेडे झाला होतात. महाराज हा नुसता नावाचा मंत्र नाही, तुमच्या मनात तिच्याविषयी उचंबळून आलेल्या भावनांचं रेखाचित्र आहे हे."

सुलूचं तर्कशास्त्र थक्क करून टाकणारं होतं. स्वभावतःच मानसशास्त्रही तिला अवगत झालेलं होतं. तिनं काढलेला निष्कर्ष अचूक होता.

" बोला ना. आता गप्प का?"

" सुलू" मी काहीसा शाळून म्हणालो–" काही अंशी बरोबर आहे तुझा तर्क पण हे सारं एकतर्फीच होतं. तुला वाटतो तसा प्रसंग कधीच घडलेला नाही. विश्वास ठेव सुलू! नन्दूची आठवणही विसरलो होतो मी. हृदयाच्या या सोनेरी चौकटीत तुझं चित्र कायमचं बसवलं गेलं आहे सुलू–दुसऱ्या कुठल्याही चित्राचा शिरकावच कसा होईल तिथं?"

" अगदी खरं?"

" विश्वास नाही बसत तुझा?"

" पराकाष्ठेचा विश्वास वाटतो मला. म्हणूनच वाटतं की त्याला सूक्ष्मसा देखील तडा जाऊ नये. शाम, जिवापाड प्रेम आहे माझं तुझ्यावर! त्या प्रेमाचा अनादर होऊ नये एवढंच सुचवावचंय मला. अधिक उणं बोलले असेन तर माफ करा. रागाऊ नका. माझं मन, माझं प्रेम समजावून घ्या."

" तू काळजी करूं नकोस सुलू! शाम सर्वस्वी तुझा आहे. आणि सदैव तो फक्त तुझाच राहील!"

माझ्या त्या अभिवचनानं सुलू तृप्त झाली होती. कडकडून मिठी मारली होती तिनं आणि––

––म्हणूनच आकस्मिकपणे दादरला झालेली नन्दूची भेट आणि त्या भेटीत तिनं दाखवलेली आस्था या गोष्टीची वाच्यता मी सुलूजवळ केली नाही. नन्दू मुंबईतच आहे. ती मला भेटली. तिनं जेवणाचं आमंत्रण दिलं. हे सत्य सुलूला समजलं असतं तर ती अस्वस्थ झाली असती. तिनं माझ्यावर टाकलेल्या पराकाष्ठेच्या विश्वासाला ओरखडा उठला असता. बायकांची मनं कमालीची सुपीक असतात. संशयाची बीजं त्यात तावडतोब रुजतात. त्या बीजापोटी निर्माण होणारे वृक्ष काटेरी असतात. सुलूच्या मनात हे बीज रुजणं इष्ट नव्हतं. नन्दूची आणि माझी भेट झाली ही गोष्ट सुलूपासून कायमची गुप्त ठेवण्याचा निर्णय मी घेऊन टाकला होता. अशी गुप्तता राखण्यात मी काही वावगं करीत आहे असं मला वाटत नव्हतं. परिचय नव्यानं झाला होता. तो वाढीस लावणं न लावणं माझ्या स्वाधीन होतं. केवळ ही गोष्ट सुलूला समजणार नाही याची दक्षतापूर्वक काळजी घ्यायला हवी होती.

नन्दूचं नाव चुकूनसुद्धा तोंडी येणार नाही अशी सावधगिरी बाळगायला हवी होती.

सुलूनं माझ्यावर टाकलेल्या पराकाष्ठेच्या विश्वासाला तडा जाऊ न देण्याची पराकाष्ठा मी करणार होतो. ती माझ्यावर जिवापाड प्रेम करते याबद्दल मला खात्री होती, त्या तिच्या उत्कट प्रेमाचा अनादर करण्याची पुसट भावनाही माझ्या मनाला शिवली नव्हती. नन्दूचा आणि माझा परिचय क्रमाक्रमानं वाढत जाणार याबद्दल संदेह नव्हता. पण त्या परिचयातून पूर्वीच्या सुप्त भावना लवमात्र डोकावणार नाहीत याची मी अतिशय निष्ठापूर्वक काळजी घेणार होतो. माझी एके काळची आराध्य प्रीतिदेवता म्हणून अजूनही माझं मन तिच्याभोवती घुटमळत होतं. ज्योत आणि पतंग यांच्यामध्ये पूर्वी जशी कंदिलाच्या काचेसारखी शोभाताई उभी होती तशी संयमाची काच मी माझ्या आणि नन्दूच्या नव्या परिचयात अढळपणे उभी करणार होतो. हा परिचय, ही पुनर्भेट, हा नवीन दुवा कायमचा सावला जाणं अयोग्य आहे याची मला जाणीव होती. पण तशी जाणीव असतानासुद्धा कसली तरी उणीव भरून निघाल्याचं सुप्त समाधान माझ्या मनाला लाभलं होतं. नगरला नन्दू मला दिसत होती. तिला जवळून पाहण्याची संधी मला वारंवार मिळत होती. तिच्याभोवती माझा हृदयभृंग एकसारखी रुंजी घालीत होता. पण नंदूशी साधं संभाषण करणंही मला त्या वेळी अशक्य झालेलं होतं. ते प्रेमपत्र तिला पाठविण्यापूर्वी माझ्या मनाच्या झालेल्या अवस्थेची कल्पना तिला होती किंवा नाही हे मला समजून घेण्याइतकीदेखील संधी मला कधी प्राप्त झालेली नव्हती. आज मला ते सुप्त समाधान वाटत होतं ते याच गोष्टीचं की लग्नानंतर का होईना माझं तिनं स्वागत केलं होतं. आपणहून ओळख दिली होती. तिच्या दृष्टीनं मी नादान तरुण म्हणून गणला गेलेलो असतो, ते पत्र पाठविण्यात माझ्या हातून अक्षम्य प्रमाद घडला होता अशी तिची भावना त्याच वेळी झालेली असती, तर मामा काण्याच्या हॉटेलात समोरच्या खुर्चीवर बसलेल्या शाम मुजुमदारला ओळखलं असूनही तिनं ओळख देणं टाळलं असतं. त्याउलट मी तिला ओळखलं असतं आणि पूर्वीची ओळख प्रदर्शित केली असती तर कदाचित तिला ते रुचलं नसतं. एखाद्या लंपट पुरुषाला झुरळासारखं झटकून टाकण्याचं जे एक अदृश्य हत्यार प्रत्येक चाणाक्ष स्त्रीजवळ असतं ते हत्यार तिनं माझ्यावर चालवलं असतं. पण तसं काही एक न घडता उलट माझं अपेक्षेबाहेर स्वागत झालं होतं. नंदूच्या हृदयात एक पूर्वपरिचित व्यक्ती म्हणून का होईना अद्याप मला कुठल्याही कोपऱ्यात का होईना स्थान होतं या गोष्टीचं मला खासच समाधान वाटत होतं. एके काळी केलेल्या प्रेमाचं, भावनेच्या आहारी आऊन धाडसानं पाठवलेल्या प्रेमपत्राचं त्या वेळी उत्तर मिळालं नव्हतं तरी आज इतक्या उशिरा का होईना साधी पोहोच मिळाली याचंच मला सुप्त पण निरतिशय समाधान वाटत होतं. नंदू पूर्वी जशी होती तशीच आताही होती. तितकीच मोहक. तितकीच टवटवीत. तितकीच प्रज्वलित. तितकीच

आल्हाददायक. आकर्षक. आजही मी तिच्याकडे आकर्षित झालो होतो. पण ते आकर्षण एका चौकटीत बंदिस्त करून ठेवायचं ठरवलं होतं मी. तिचं सान्निध्य मला हवं होतं. पण सार्वजनिक बगीच्यात मिळणाऱ्या मनमोहक, सुकुमार, सुगंधित फुलाचं असावं तसं. पाहायचं पण दुरून. त्यांचा नाजूकपणा अनुभवायचा पण केवळ नजरेच्या स्पर्शानं. सुगंधानं बेभान होऊन जायचं पण ठराविक कक्षेत राहून.

—मी त्या दिवशी संध्याकाळी ऑफिस सुटल्यावर चेंबूरला गेलो. बंद दरवाजावरची 'अजित लाड' ही पाटी पाहून घंटेचं बटण दाबलं. अंमळशानं आतून नंदूचा आवाज आला.

"कोण आहे?"

"मी. शाम–"

"अय्या" उघडलेल्या दारात लाजवंती नंदू सोनेरी चौकटीतल्या रमणीय चित्रासारखी उभी होती.

"अजित आले नाहीत अजून?"

"अजून अवकाश आहे त्यांना यायला. ये ना. बैस."

मी कोचावर बसलो.

"मला खात्री वाटत नव्हती." नंदू म्हणाली.

"कसली?"

"तूं येशीलच याची."

"का?"

"तसं काही नाही उगीचच वाटलं मला."

"काय वाटलं?"

"माझ्यावर रागावला असशील तू."

"रागावलो? आणि तुझ्यावर? काय संबंध रागावण्याचा? उलट मलाच तशी भीती––"

"राहूं दे तो विषय. एखाद्या वंचित सौख्याबद्दल मागाहून उसासे टाकण्यात स्वारस्य नाही! नंतर का होईना आणि अशा संबंधानं का होईना आपण जवळ येऊ शकलो हाही आनंद कमी नाही. चहाच घेशील ना तू?"

मी मानेनच होकार दिला. नंदू चहा आणायला आत गेली.

तिची ती वाक्यं फेर धरून माझ्या डोक्याभोवती पिंगा घालीत राहिली. त्या वाक्यातल्या शब्दाशब्दाचा मी मनातल्या मनात अर्थ लावीत राहिलो. जशी स्थिती माझ्या मनाची झालेली होती तशीच तिच्याही मनाची झाली असल्याचा निर्वाळा मला त्या शब्दाशब्दांतून मिळत होता. उघड्या दरवाजातून छोटा राजू आत आला आणि शब्दांचा तो पिंगा थांबला. राजू मला पाहून गोंधळला आणि सरळ आतल्या खोलीत निघून गेला.

" अरे भितोस काय असा ? काका आहेत ते. काल नव्हते का भेटले आपल्याला दादरला ? त्यांना नमस्ते कर. जा. " नंदूचा आवाज आला आणि पाठोपाठ चहाचा ट्रे घेऊन ती बाहेर आली.

" शोभानं हल्ली गायन सोडून दिलंय वाटतं ? रेडियोवर ऐकलं नाही अली-कडे " चहाचा कप माझ्या हातात देताना तिनं विचारलं. कप हातात देताना माझ्या बोटांना तिनं केलेला स्पर्श मुद्दाम केल्यासारखा वाटला मला.

" संसार पाठीमागं लागला की जीवनही बदलतं माणसाचं. " मी म्हटलं.

" जीवन बदललं तरी पूर्वीच्या स्मृती कायम राहतात, " ती म्हणाली–"नगरचं ते जीवन आठवलं की अजूनही मन रमून जातं. "

" इतकं रमून जाण्यासारखं काय होतं त्या जीवनात ?"

" शोभा होती. माली होती. शकू होती. एकेक प्रिय आणि आवडती माणसं होती. आयुष्य मोठं विचित्र आहे. निदान आम्हा स्त्रियांचं तरी तसं आहे. जिथं जीव रमलेला असतो ते ठिकाण, ती माणसं सोडून अगदी अपरिचित ठिकाणी येऊन पडायचं. मनात अस्ते अस्ते या नव्या माणसांशी एकरूप व्हायचं. त्यांच्याशी जमवून घ्यायचं. "

" अजितांचा आणि तुझा आधीचा परिचय होता ना ?"

" कुणी सांगितलं तुला ?"

" सांगितलं नाही कुणी मला आपलं वाटत होत तसं. "

" खरं सांगायचं तर मी तयार नव्हते या लग्नाला. पण अण्णांपुढं माझं आणि आईचं काहीच चालू शकलं नाही. "

" आधीच कुणाची तरी निवड करून ठेवली होतीस तू ?"

" होय. सांगू कुणाची ?"

" ? "

" तुझी. मला तू हवा होतास, शाम–"

" नंदू ! "

तिच्या एकटक नजरेत कारुण्य होतं. शरणागती होती. तिच्या नजरेशी भिड-लेली नजर मी काहीशी गोंधळलेल्या अवस्थेत हातातल्या कपाकडे वळवली आणि तिथंच ती स्थिर केली. आणि त्यानंतर अजित आणि नंदूचा निरोप घेऊन त्या घरातून बाहेर पडेपर्यंत मी तिच्या चेहऱ्याकडं बघितलंच नाही. नंदूनं पैज जिंकली होती. पण मी मात्र हरलो होतो.

––माझ्या मनाचा जितका गोंधळ उडाला होता तितकीच कसलीशी भीती त्याला स्पर्श करीत होती. लिलाव पाहायला म्हणून थांबावं. सहजगत्या त्या ओघात वाढती किंमत बोलावी आणि ताबडतोब एक दोन तीनवार होऊन वस्तू आपल्या पदरात पडावी तसं हे सार घडलं होतं. या सुरुवातीच्याच भेटीत नंदू इतकी मनमोकळी बोलेल, आणि व्यथा इतक्या उघडपणे सांगल असं वाटलं नव्हतं.

अशा अवस्थेत हा संबंध वाढू देणं मी मनाशी ठरवलेल्या कक्षेबाहेरचं होतं. सुलूनं माझ्यावर टाकलेल्या विश्वासाला तडा न जाऊ देण्याचा, तिच्या उत्कट आणि पवित्र प्रेमाचा अनादर न करण्याचा, ज्योत आणि पतंगात ती संयमाची काच अढळपणे उभी करण्याचा जो निश्चय मी केला होता तो ढळेल अशीच भीती मला आता वाटायला लागली होती. मला तसलं काही घडायला नको होतं. जे घडावं असं मला मनोमन वाटत होतं ते घडून आलं होतं. उशिरा का होईना पण माझ्या त्या प्रेमपत्राची साची पोहोच मिळाल्याचा जो आनंद मला काल वाटला होता त्याहीपेक्षा अनंत पटींनी अधिक आज माझी पुरेपुर खात्री झाली होती की नंदू-सारख्या लाखातल्या एका स्वरूपसुंदर स्त्रीचा हृदयेश्वर होण्याइतकी पात्रता माझ्या ठिकाणी होती आणि आजही आहे. नंदूनं माझा अव्हेर केला अशा समजुतीनं जो मी त्या वेळी खट्टू झालो होतो, माझ्या स्वतःच्या नालायकीवर स्वतःच चिडलो होतो, अंतर्यामी व्यथित झालो होतो ती माझी व्यथा संपूर्णपणे आज निवळली होती. माझ्या खऱ्या योग्यतेचा स्पष्ट निर्वाळा मला मिळाला होता. यातून यापुढं जे निष्पन्न होणार होतं ते मात्र गैर असू शकणार होतं. म्हणूनच फुटू पाहणारा या काटेरी वृक्षाचा अंकुर त्यानं डोकं वर काढण्यापूर्वीच तो नष्ट करायचं ठरवून मी त्याच क्षणी ठाम निश्चय करून टाकला की नंदूच्या घरची पायरी पुन्हा चढायची नाही. तिचं तोंड पुन्हा पाहायचं नाही. ○

काळ्याभोर रेशमी विपुल केसांकरिता

डोंगरे

अप्सरा

हेअर ऑईल

उत्पादक

के. टी. डोंगरे अॅण्ड कं., प्रा. लि.,

मुंबई, कानपूर, नैरोबी ( आफ्रिका )

डोंगरे बालामृताचे

# भिंतीच्या वेंबड्या

सुधाकर राजे

## □ प्रियकराच्या जागेसाठी अर्ज

वर पाहिजे किंवा वधू पाहिजे अशा जाहिराती आता आपल्याकडच्या वर्तमानपत्रांत सर्रास पाहायला मिळतात. पण परवा म्हणे एका पाश्चिमात्य वर्तमानपत्राच्या 'पाहिजे'च्या रकान्यात एक अजब जाहिरात झळकली– "प्रियकर पाहिजे!" म्हणजे आता कमाल आहे की नाही? 'प्रीति मिळेल का हो बाजारी? नाही.' असा सवाल-जवाब खूप पूर्वीच एका मराठी सिनेमात झाला होता. पण प्रत्येक बाबतीत जाहिरातबाजीला सवकलेल्या पश्चिमेची ही प्रेयसी भेट प्रेमाचे टेंडर भरून मागायला निघालेली दिसते. आता प्रियकराच्या जागेसाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांजवळ काय काय क्वालिफिकेशन्स असली पाहिजेत याचा तपशील उपलब्ध नाही. पण इंटरव्ह्यूमध्ये काय प्रश्न विचारले जाऊ शकतील याचा अंदाज माझ्यासारखा अनभिज्ञ माणूसदेखील करू शकेल–

१. तुम्हांला प्रेम करायचा अनुभव किती आहे?

२. प्रेम करण्याचे वर्किंग अवर्स काय असावेत असे तुम्हाला वाटते?

३. आदर्श प्रेमवीर कसा असावा याचे फॉरीनला जाऊन उच्च शिक्षण घेण्यासाठी तुम्ही हिंदुस्थानात जाऊन एखाद्या हिंदी चित्रपट-दिग्दर्शकाकडे उमेदवारी केली आहे काय?

४. प्रियकर-प्रेयसी एकमेकांना हृदय देतात त्यात, अन् हल्ली काही डॉक्टर्स एकाचे हृदय दुसऱ्याला देतात त्यात, फरक काय?

५. 'डियरनेस अलाउन्स'मधील 'डियर'चा अर्थ नेमका काय? आमच्याकडे डियरनेस अलाउन्स मिळणार नाही–डार्लिंगनेस अलाउन्स मिळेल.

६. पुढे मागे तुम्हाला योग्यता पाहून पर्मनंट करण्यात आले तर तुम्ही नवरा म्हणून जन्मभर इमाने-इतबारे नोकरी करायला तयार आहात काय?

## □ जिवंत माणसाचे सरकारी लक्षण

जिवंत माणसाचे लक्षण काय? या प्रश्नाची दोन उत्तरे आहेत–एक सरळ व दुसरे सरकारी. साध्या-सरळ माणसांना व वैज्ञानिकांनाही पटणारे उत्तर म्हणजे श्वासोच्छ्वास करतो त्याला जिवंत माणूस म्हणावे. पण सरकारी उत्तर इतके साधे नाही. ज्याच्याजवळ जिवंतपणाचे सर्टिफिकेट आहे त्यालाच जिवंत म्हणता येईल असा सरकारी सिद्धान्त आहे. परवाच एका सरकारी अधिकाऱ्यानं स्वतःचा अनुभव

सांगितला की तो रजेवरून परत येऊन नोकरीवर पुनः रुजू झाला व त्याने रजेच्या पगाराची मागणी केली तेव्हा ती फेटाळण्यात आली. का ?–" तुमच्या अर्जाबरोबर तुम्ही जिवंत असल्याचा दाखला नाही, सबब तुम्ही जिवंत आहात असे मानता येत नाही. " आता बोला ! देवाने माणसाला जन्माला घातले तेव्हा त्याच्या शरीरात जीव फुंकला खरा, पण त्याच्या हातात जिवंतपणाचे अधिकृत सर्टिफिकेट दिले नाही हा केवढा मोठा हलगर्जीपणा केला, नाही का ? बरे झाले ही अक्षम्य चूक आपल्या चाणाक्ष सरकारच्या चटकन लक्षात आली, नाहीतर कित्येक अन्-सर्टिफाइड (म्हणजेच मेलेली) माणसे चक्क जिवंत म्हणून मिरवली असती.

## ☐ देवाला तंदुरी चिकनचा नैवेद्य

हिंदुस्थानातले लोक इतर सगळ्या बाबतींत मागासलेले असले तरी देवभक्तीच्या तंत्रात तरी त्यांच्याइतका इतर कोणी सुधारलेला नसेल अशी माझी समजूत होती. पण माझ्यासारख्या नास्तिकांतही हा वृथा अभिमान सोडून देण्याची वेळ आलेली दिसते. अमेरिकेत काही 'हिप्पी' मंडळींनी नुकतेच एका चर्चसमोर धरणे धरले आणि अशी मागणी केली की, चर्च चोवीस तास उघडे राहिले पाहिजे. नुसते प्रार्थनेसाठी नव्हे, तर गाणे-बजावणे, नाचणे आणि खाणे या कार्यक्रमांसाठीदेखील ! आता सांगा, देवळात जाऊन फक्त देवदर्शन घेऊन परतणारे आपण लोक किती मागासलेले आहोत ! आता आपल्या देवळातही गाणे-बजावणे अन् नाचणे नव्हते असे नाही, पण आपल्या तेहतीस कोटी देवांपैकी एकाने तरी टिवस्ट पाहिला आहे का, किंवा बीटल्सचे 'पॉप म्युझिक' ऐकले आहे का ? आणि आपल्याकडे नैवेद्य, प्रसाद, भंडार इत्यादी प्रकार असले तरी तंदुरी चिकन कोठल्या हिंदू देवाच्या नशिबी आहे ? हिंदूंचे देव हिंदूंच्याइतकेच स्तुतिप्रिय असले तरी एकसारखे 'स्तवन' ऐकून देखील त्यांना कंटाळा आला नसेल ? मला वाटते त्यांच्याही सोशल लाइफ-मध्ये अशी काही व्हरायटी आणली तर ते लवकर प्रसन्न होतील.

## ☐ पोट सुटलेली संपत्ती

'पोटिमा' पोलक्याचा उपयोग काय ? या प्रश्नाचे एक अनपेक्षित उत्तर म्हणजे पैशाच्या व्यवहाराची सोय. थोड्या दिवसांपूर्वी इंग्लंडमधल्या एका तरुणीने आपल्या उघड्या पोटावर चेक लिहिला व बँकेच्या मॅनेजरानेही म्हणे तो स्वीकारला. घ्या, म्हणजे चेकबुक संभाळायची कटकट मिटली. आता आपल्याकडच्या शेटजीच्या गरगरीत पोटावरून त्याच्या संपत्तीची नुसती अप्रत्यक्ष कल्पनाच येईल असे नाही, तर केवढ्या मोठ्या पोटावर किती मोठा चेक लिहिता येईल याचे मोजमाप घेऊन त्याच्या संपत्तीचा हिशोबही लावता येईल. अर्थात रोड पोटाच्या माणसाची लक्ष्मीही रोडच असणार हे ओघानेच आले.

○

# व्होल्गा जेव्हा लाल होते

# ७

वि. स. वाळिंबे

१ मे १९१८

क्रेमलिनच्या भिंतीवर उभे राहून लेनिन लाल चौकातील मे दिनाचे संचलन पाहात होता. याच ठिकाणी उभे राहून एकदा नेपोलियनने जळणाऱ्या मॉस्कोवर नजर फेकली होती. मध्यंतरी शंभराहून अधिक वर्षांचा काळ लोटला होता. युरोपच्या नकाशात कितीतरी बदल झाले होते आणि आता तर अगदी नवीन घटना घडली होती. जगातले पहिले साम्यवादी सरकार अस्तित्वात आले होते. आणि या क्रांतीचा प्रणेता आपल्या सहकाऱ्यांना सांगत होता, 'आपण आपला जनतेबरोबरचा संबंध कधीही तुटू देता कामा नये. कारण हा संबंध हाच आपला आधार असतो.'

एवढे सांगून लेनिनने विचारले, 'लोक आपल्या राजवटीसंबंधी काय म्हणताहेत ? ते खूष आहेत ना ? आजचं हे संचलन स्वयंस्फूर्त आहे की आपण घडवून आणलं आहे ?'

रशियासारख्या विशाल देशाची सर्व सूत्रे हाती येऊनही लेनिनच्या साध्या राहणीत किंचितही बदल झालेला नव्हता. गेली कित्येक शतके ज्या शाही इमारतीत रशियाचे सम्राट विलासी जीवन उपभोगीत होते तेथे आता विलासाची एकही खूण उरलेली नव्हती. क्रुपस्काया, मारिआ आणि एक मोलकरीण एवढी तीनच माणसे लेनिनबरोबर राहात होती. झारच्या चांदीच्या भांड्यांतून त्यांचे अन्न शिजविले जात असले तरी अन्नाच्या रुचीकडेही लक्ष दिले जात नसे. अहोरात्र क्रांतीच्या ध्यासाने पेटून निघालेल्या लेनिनला जीवनाच्या इतर कोणत्याच क्षेत्रात रस नव्हता.

'आता तू प्रधानमंत्री झाला असल्यामुळे थोडंसं छानछोकीनं राहायला हवंस' असं कोणी म्हणताच लेनिन उत्तर द्यायचा, 'आम्ही मूळचे क्रांतिकारक. जे रक्तातच नाही त्याचा देखावा तरी कसा करता येणार ? मी आपला रांगडा गडी आहे.'

शंभर वर्षांपूर्वी
नेपोलियन क्रेमिलनच्या भितीवरून
जळून खाक होणारे मास्को
पाहात होता;
आज त्याच भितीवरून
लेनिन अभिमानाने सैनिक-संचलन पाहात होता.

---

सर्वसामान्य नागरिक कम्युनिस्ट राजवटीसंबंधी काय बोलतो हे जाणून घ्यायला लेनिन सदैव उत्सुक असे. शेतकऱ्यांत व कामगारांत मिसळता यावे आणि त्यांचे मनोगत जाणून घेता यावे म्हणून तो सवड सापडली की मॉस्कोबाहेर जाऊन लहान गावात फेरफटका मारून येई. असाच एकदा तो मॉस्कोलगतच्या जंगलात फिरत असताना त्याला एक म्हातारा गृहस्थ भेटला.

लेनिनने विचारले, 'कसं काय आजोबा? ठीक चाललं आहे ना?'

'खड्ड्यात जावो ही नवी राजवट! पूर्वीसारखं आता या जंगलातदेखील काही खायला मिळत नाही'–म्हातारा चवताळला होता.

'का बुवा, काय झालं? तुम्हाला आपलं नवं सरकार आवडत नाही का?'

'का आवडावं?'–म्हाताऱ्यानं प्रतिप्रश्न केला. 'या नव्या सरकारनं सगळं काही नष्ट करून टाकलंय. आम्हाला लुबाडलंय!'

'आजोबा, असं रागावू नका. आणखी काही थोडे दिवस थांबा. आपलं नवं सरकार आता खूप कारखाने उभारणार आहे.'

या म्हाताऱ्यासारखा संताप कानी पडला की लेनिन अस्वस्थ व्हायचा.

या काळात लेनिनवर कामाचा खूप ताण पडायचा. तो सकाळी दहा वाजता उठत असे. अकरा वाजायच्या सुमारास तो कचेरीत येऊन दाखल होई आणि त्यानंतर दुसऱ्या दिवशी सकाळी सहा वाजेपर्यंत त्याचे काम चालू असे. सकाळी सहा ते दहा हीच काय ती लेनिनची झोपायची वेळ असे. लेनिनच्या टेबलावर फायलींचा ढीग असायचा आणि त्या फायलीतील प्रत्येक कागद आपल्या नजरेखालून गेला पाहिजे यासाठी तो दक्ष असायचा. दररोज कोणाला मुलाखतीला बोलावले आहे याची पाठीमागच्या फळ्यावर नोंद केलेली असायची. कोणाशीही गप्पा मारीत बसणे

त्याला आवडत नसे. त्यामुळे आपला सहकारी मंत्री असो, वरिष्ठ सरकारी अधिकारी असो किंवा कोणी सर्वसामान्य नागरिक असो, त्याला दिलेल्या वेळेत ती मुलाखत आटोपलीच पाहिजे अशी तो काळजी घेत असे. एखादी व्यक्ती ज्या कामासाठी आलेली असेल त्या कामाव्यतिरिक्त इतर कोणत्याही विषयाबद्दल लेनिन त्या व्यक्तीशी चर्चा करीत नसे.

संध्याकाळी पाच वाजता लेनिन जेवण्यासाठी घरी जाऊन येत असे. जेवणाची ही वेळ तो कधीही चुकवीत नसे आणि आपल्या सहकाऱ्यांनीही कामाच्या आणि विश्रांतीच्या वेळा काटेकोर रीतीने पाळल्या पाहिजेत असा त्याचा आग्रह असायचा. तो आपल्या भोवतालच्या लोकांना सांगायचा, 'आपण केव्हा काम करायचं आणि केव्हा विश्रांती घ्यायची हे ज्याचं त्यानं ठरवावं. पण ज्या वेळेला जे करायचं ठरलं' असेल त्यात बदल होता कामा नये. जेवणाची वेळदेखील कोणी बदलता कामा नये.

ऋपस्काया शिक्षणखात्यात उपमंत्री म्हणून काम करीत होती. तिनेही ठराविक वेळी जेवले पाहिजे असे लेनिन तिला सारखे बजावत असे. जेवणाची वेळ झाली की लेनिन आपली गाडी तिच्याकडे धाडून देई. त्या वेळी ड्रायव्हरला सक्त ताकीद असे 'बाईसाहेब खोलीतून बाहेर पडण्याची वाट पाहात थांबायचं नाही. त्यांच्या कचेरीत जाऊन गाडी आलीयं असं त्यांना सांगायचं.'

पाच वाजता जेवायला गेलेला लेनिन बरोबर सात वाजता आपल्या कचेरीत परतलेला असायचा. संध्याकाळची वेळ सहकाऱ्यांबरोबरच्या चर्चेसाठी राखून ठेवलेली असे. त्यामुळे जेवतानाही तो आपल्या चिटणिसाला फोन करून आज कोण भेटायला येणार आहे यासंबंधी माहिती विचारत असे. तो फोन करून विचारी—

'सगळ्या मंत्र्यांना बैठकीचा निरोप गेला आहे ना ?"

" होय."

" कितीजण आले आहेत ?"

" तिघेजण."

" छे, पुन्हा असं होता कामा नये. सातला पाच मिनिटं कमी आहेत. मी पाच मिनिटांत तिथं येतो. तेवढ्यात सगळ्यांना फोन करून तावडतोब आलं पाहिजे असं सांग."

लेनिनच्या मंत्रिमंडळाची संध्याकाळी सात वाजता सुरू होणारी बैठक रात्री एक दोन वाजेपर्यंत चालू असायची. त्यानंतर तो पुन्हा आपले कामकाज सुरू करी. सहकारी आपापल्या घरी जाऊ लागले की लेनिन त्यांना सांगे, "काही महत्त्वाचं काम असेल तर मला झोपेतून उठवायला संकोच करू नका हं."

आपल्या सहकाऱ्यांनीही भरपूर काम केले पाहिजे यासाठी लेनिनची बारीक नजर असायची. मंत्रिमंडळाची बैठक सुरू असताना उगाच कोणत्या तरी विषयावर गप्पा सुरू झाल्या आहेत असे घडत नसे. एखाद्या मंत्र्याने तसा विषय काढला

तरी लेनिन त्याला उत्तेजन देत नसे. उलट तो म्हणायचा, 'हे बवा, आधी आपल्याला काम पुरे केलं पाहिजे. गप्पा काय, केव्हाही मारता येतील.' कोणत्याही विषयाचा दहा मिनिटांत निर्णय व्हायला हवा असा लेनिनचा कटाक्ष असे. एखाद्याने चर्चेच्या ओघात महत्त्वाचा विचार मांडला तर लेनिन लागलीच त्याचे टिपण करून ठेवी. या टिपणातील महत्त्वाच्या शब्दांखाली त्याने रेघा मारलेल्या असायच्या. जेव्हा तो त्याबाबतचा आपला निर्णय नोंदवून ठेवी तेव्हा तेथे उभी रेघ मारलेली असायची. त्यामुळे एखाद्या मंत्र्याचे बोलणे पुरे होताच लेनिन त्या मंत्र्याने मांडलेले मुद्दे आणि त्याबाबतचे आपले मत लगलीच सांगत असे.

सतत कार्यमग्न राहणं हे लेनिनचे स्वभाववैशिष्ट्यच होते. हाती घेतलेल्या कामाशिवाय इतर कोणत्याच गोष्टीत त्याला रस नव्हता. त्यामुळे त्याच्याबरोबर काम करणाऱ्यांची मात्र पंचाईत होत असे. एखाद्या दिवशी संरक्षण मंडळाची बैठक सात आठ तास चाले. शेवटी शेवटी सारेजण कंटाळलेले असत. परंतु लेनिन मात्र जणू काही बठक आताच सुरू झाली आहे अशा उत्साहाने बोलत असे. भोवतालचे लोक कंटाळलेले आहेत असे दिसून आले की लेनिन हास्यविनोद करी आणि त्यामुळे पुन्हा बैठकीला रंग भरे.

लेनिनने बोलवलेल्या बैठकीला एखाद्या शालेय वर्गाचे स्वरूप आलेले असे. प्रत्येक गोष्ट तो इतक्या वेळा समजावून सांगे की आपल्या सहकाऱ्यांच्या बुद्धिमत्तेवर त्यांचा किंचितही विश्वास नसावा असा तिऱ्हाइताचा ग्रह होई. लेनिनला धूम्रपानाचा तिटकारा असल्यामुळे तो बैठकीत कोणालाही धूम्रपान करण्याची परवानगी देत नसे. 'ज्याला कोणाला धूम्रपान करायचं असेल त्यानं बाहेर जाऊन धूम्रपान करून यावं' अशी त्याची सूचना होती. अशा एखाद्या बैठकीला परराष्ट्रांतील अधिकारी हजर असला तर त्याला या प्रकाराचे आश्चर्य वाटे. मंत्रिपदे भूषविणारे नेते चोरट्या पायांनी बाहेर जात व दोन चार झुरके ओढून पुन्हा आपल्या जागांवर जाऊन बसत. काही काही वेळेला अनेकांना धूम्रपानाची लहर येई. ते सारेजण खोलीबाहेर येऊन धूम्रपान करताना बारीक आवाजात आपापसांत गप्पा मारीत. परंतु एवढा गोंगाटही लेनिनला सहन होत नसे. सर्व मंडळी धूम्रपान करून परत येईपर्यंत लेनिन स्वस्थ बसे.

लेनिनला प्रारंभापासून आपल्या आईबद्दल आणि बहिणीबद्दल अगत्य वाटायचे. या दोन व्यक्ती सोडल्या तर नात्यातील इतर कोणाही व्यक्तीबद्दल त्याला मुळीच ममत्व वाटत नव्हते. तो जसा आपल्या सहकाऱ्यांच्या आणि मित्रांच्या बाबतीत अलिप्तपणाने वागायचा तसेच कुटुंबियांबद्दलही त्याचे वर्तन होते. लेनिनचे दवत असे एकच होते आणि ते म्हणजे झारशाहीशी झुंज घेताना प्राणार्पण केलेला

त्याचा थोरला भाऊ ॲलेक्झांडर. ॲना या आपल्या बहिणीबद्दलही तो आदराने बोलायचा. तो म्हणायचा ' डोकं असलेली तीच एक स्त्री आहे. ' परंतु ॲनाने मार्क एलिझारोव्ह याच्याशी लग्न केल्यामुळे लेनिनचा तिच्यावर रोष झाला होता. मारिआ या आपल्या दुसऱ्या बहिणीसंबंधी तो म्हणे, ' ती असला वेडेपणा करणार नाही याची मला खात्री आहे. ' डिमट्री या आपल्या धाकट्या भावाबद्दल बोलताना लेनिन म्हणायचा, ' येशॉव्ह या लेखकानं आपल्या परिकथांमध्ये तिसरा भाऊ कसा रंगवलाय ते माहीत आहे ना ? येशॉव्हच्या साऱ्या गोष्टींमधला सर्वांत थोरला भाऊ शहाणा असतो. मधला जेमतेम बुद्धीचा असतो आणि धाकटा निर्बुद्ध असतो. डिमट्रीचं तसंच आहे. '

लेनिनला खूष करण्यासाठी त्याच्या सहकाऱ्यांनी त्याला न कळविता डिमट्रीला क्रीमियामध्ये एका मोठ्या हुद्द्यावर नेमले. लेनिनला जेव्हा ही गोष्ट कळली तेव्हा तो खूप रागावला. तो क्रासिनला म्हणाला, ' डिमट्रीची एवढ्या मोठ्या अधिकारपदावर नेमणूक करून या मूर्खांनी आपण किती मूर्ख आहोत हे पुन्हा एकदा सिद्ध केलेलं आहे. डिमट्रीचं आणि माझं आडनाव एक आहे म्हणून त्याचा मूर्खपणा काही लपून राहात नाही. '

ॲना आपल्या नवऱ्याला व मुलांना घेऊन लेनिनला नेहमी भेटायला येत असायची. कधीकधी लेनिन त्यांच्याबरोबर जलविहाराला जायचा. कामाच्या ताणामुळे क्रुपस्कायाची प्रकृती बिघडली असताना तिला रुग्णालयात ठेवले होते. त्या वेळी ॲनाला घेऊनच लेनिन क्रुपस्कायाला भेटायला जात असे. एकदा लेनिन आणि ॲना क्रुपस्कायाला भेटण्यासाठी निघाले असताना दोन चोरांनी त्यांची गाडी अडविली. हातातला सुरा दाखवीत एक चोर म्हणाला ' पैसे दे नाही तर आम्ही तुझा खून करू. '

' मी लेनिन आहे '– लेनिनने शांतपणाने सांगितले. पण हे नाव ऐकूनही चोरांना काही बोध झाला नाही. ते पुन्हा जोराने ओरडले, ' पैसे दे नाही तर खून करू. '

' माझ्याजवळ पैसे नाहीत–' लेनिनने उत्तर दिले. तो आणि ॲना मोटारीतून खाली उतरले आणि पायी जाऊ लागले. हा मोटारवाला श्रीमंत नाही हे त्या चोरांना कळून आले असावे. त्यांनी दुसरी वाट धरली होती.

१९२० च्या फेब्रुवारीमध्ये इनेसा आर्मंद आजारी पडली. क्रांतीनंतर इनेसा बोल्शेव्हिक पक्षाच्या मध्यवर्ती समितीच्या महिला शाखेची प्रमुख म्हणून काम करीत होती. इनेसा आजारी आहे हे जेव्हा लेनिनला कळले तेव्हा त्याने तिला पत्र धाडून सांगितले, ' तुझ्या प्रकृतीसंबंधी मला सविस्तर माहिती कळव. सध्या टायफॉईड्, इन्फ्लुएंझा, कॉलरा यांच्या साथी पसरल्या आहेत. मी नुकताच आजारातून उठलो असल्यामुळे अद्याप बाहेर पडत नाही. तुला कशाचीही जरूर

असली तरी त्याबद्दल मला निःसंकोचपणे कळव. तू मोकळेपणाने कळवशील अशी मला आशा आहे. लवकर बरी हो.'

थोडेसे बरे वाटताच इनेसा कामावर रुजू झाली तेव्हा लेनिनने तिला लिहिले– "अंगात ताप असताना कामावर जाणं हा शुद्ध मूर्खपणा आहे. तू पूर्ण बरी होईपर्यंत विश्रांती घे. 'आपल्या मुलींना' माझा असा निरोप सांग की त्यांनी तुझी नीट काळजी घेतली पाहिजे. डॉक्टर परवानगी देईपर्यंत तू घराबाहेर पडणार नाहीस याची दक्षता घेण्याची त्यांच्यावरच जबाबदारी आहे."

इनेसा या आजारातून नीट बरी झालेली नाही असे जेव्हा लेनिनला आढळून आले तेव्हा त्याने तिला उत्तर कॉकेशसमधल्या किस्लोव्होडस्क येथील आरोग्य-भवनात धाडले. तेथे तिची प्रकृती सुधारू लागली. वेळ जावा म्हणून ती पियानो वाजवीत असे. एकदा श्वेत सैनिकांची तुकडी किस्लोव्होडस्कवर हल्ला करण्यासाठी येत असल्याची बातमी कळताच स्थानिक अधिकाऱ्यांनी आरोग्य-भवनातील सर्व आजाऱ्यांना नालाचेक येथे धाडून दिले. नालचिक येथे जात असताना इनेसाला कॉलरा झाला आणि त्यातच ती मरण पावली.

लेनिनने पहाटे तीन वाजता कझान येथील व्हिनोग्राडोव्हा हिला फोन केला– 'तुला भलत्या वेळी उठवत आहे म्हणून माफ कर. इनेसाचं शव काही तासांच्या आतच कझान स्टेशनवर आणण्यात येणार आहे. आम्ही तेथे येतच आहोत, परंतु अगोदर सर्व व्यवस्था करण्यासाठी तू तावडतोब स्टेशनवर जा.'

इनेसाचा मृत देह कझान स्टेशनवर आणण्यात आला तेव्हा लेनिन, ऋपस्काया, इनेसाची मुले आणि व्हिनोग्राडोव्हा एवढी मंडळी तेथे हजर होती. कझान स्टेशन-वरून इनेसाची अन्त्ययात्रा निघाली. लेनिन आणि ऋपस्काया यांनी मोटारीतून जावे असे सुचविण्यात आले. परंतु तसे करण्यास लेनिनने नकार दिला.

तो म्हणाला, 'मी पायीच चालणार आहे.'

या वेळी हजर असलेली अँगेलिका बालबानोव्ह लिहिते – 'इनेसाच्या मृत्यूमुळे लेनिनला किती दुःख झाले होते हे त्याच्या चेहऱ्यावरून स्पष्ट दिसत होते. तो इतका दुःखीकष्टी झालेला आमच्यापैकी कोणीही यापूर्वी कधीही पाहिलेला नव्हता. आपले दुःख इतरांना कळू नये यासाठी लेनिनची सारखी धडपड चालू होती. आपला शोक पाहून इतरांनी हळहळावे हे त्याच्या स्वभावाला मानवणारे नव्हते. केवळ त्याचा चेहराच नव्हे तर सारे शरीर दुःखावेगाने कंप पावत होते. त्या दिवशी त्याच्याशी बोलायचा मला धीर झाला नाही. आपले दुःख आपण एकट्यानेच सहन करावे असा त्याचा स्वभाव होता. दुःखाचे प्रदर्शन करणे त्याला आवडत नव्हते. आपल्या-कडे कोणीही पाहू नये म्हणून त्याने आपली टोपी कपाळावर बरीच खाली ओढली होती. डोळ्यातले अश्रू बाहेर ओघळू नयेत म्हणून लेनिनची बरीच धडपड चालली होती. तो शवपेटीकेच्या मागून चालला असताना त्याला पाहण्यासाठी लोक बरीच

गर्दी करीत होते, परंतु लेनिनला या वेळी कशाचेच भान नव्हते. इनेसाच्या आठवणीत तो बुडून गेला होता.'

अॅलेक्झांड्रा कोलोन्ताय इनेसाच्या अन्त्ययात्रेला हजर होती. मार्सेल वोडी या आपल्या मित्राशी बोलताना ती एकदा म्हणाली होती, 'इनेसाच्या शवपेटिके-मागून चालताना लेनिनचा चेहरा इतका बदलून गेला होता की निकटवर्तीयांखेरीज इतरांना लेनिन ओळखताही आला नसता. जवळजवळ डोळे मिटूनच तो चालला होता. तो कोणत्याही क्षणी खाली कोसळेल अशी आम्हाला भीती वाटत होती. इनेसा आर्मन्दच्या मृत्यूनंतर लेनिन फार काळ जगेल असे वाटत नव्हते. वर्षा दोन वर्षांच्या आतच लेनिनला आजाराने गाठले यामागे इनेसाचे निधन हे फार मोठे कारण होते असे मला वाटते.'

•

क्रांतीनंतर रशियात यादवी युद्धाचा आगडोंब उसळला असताना एकीकडे एकटा लेनिन आणि दुसरीकडे सारे जग असे दृश्य दिसत होते. त्या काळात लेनिनने आपल्या राजकीय प्रतिस्पर्ध्यांवर तिखट हल्ले चढविले होते. परंतु संघर्षाचे हे वातावरण निवळल्यानंतर लेनिनच्या स्वभावातील कडवटपणा कमी होऊ लागला होता. मार्तोव्ह हा तर त्याचा कट्टर प्रतिस्पर्धी. विजनवासात काळ कंठणारा मार्तोव्ह मृत्युशय्येवर पडला आहे असे जेव्हा लेनिनला कळले तेव्हा त्याने मार्तोव्हच्या प्रकृतीबद्दल अगत्यान चौकशी केली होती. पीटर क्रोपोटकिन आणि व्लादिमिर कोरोलेन्को यांच्या बाबतीतही असेच घडले होते.

क्रोपोटकिन गेली तीस वर्षे इतिहासकार आणि क्रांतिकारक अराजकवादी म्हणून प्रसिद्ध होता. १८८९ मध्ये त्याने लिहिलेला 'क्रांतिकारकाच्या आठवणी' हा आत्मचरित्रपर ग्रंथ बराच गाजला होता. झारशाही नष्ट केली पाहिजे असे तो तेव्हापासून प्रतिपादन करीत असे. परंतु लेनिनसारख्या 'आजीव क्रांतिकारका'चे मार्ग त्याला पसंत नव्हते. १९०९ मध्ये लिहिलेल्या लेखामध्ये क्रोपोटकिन म्हणतो, 'प्रत्येक क्रांतिकारक हुकूमशाहीचे स्वप्न पाहात असतो. कामगारांच्या हुकूमशाहीची भाषा बोलणाऱ्याच्या मनातही मूठभर नेत्यांच्या हुकूमशाहीची कल्पनाच वावरत असते. दुसरे काहीजण क्रांतिकारकांची हुकूमशाही असा शब्दप्रयोग करतात. परंतु भाषा कोणतीही असली तरी सर्व क्रांतिकारकांचे स्वप्न एकच असते. आपल्या शत्रूंना फासावर चढवून सर्व सत्ता आपल्या हाती एकवटण्यासाठी ते सारेजण अधीर झालेले असतात. आपण कायदेशीर मार्गाने सत्ता हस्तगत केलेली आहे एवढेच त्यांना दाखवायचे असते. सत्ता हस्तगत करणे हेच कोणत्याही क्रांतीचे उद्दिष्ट असते. क्रांतिकारक जेव्हा सत्ता आपल्या हातात घेतात तेव्हा ती सर्व सत्ता केवळ आपल्याच हाती राहिली पाहिजे असा त्यांचा आग्रह असतो. अशा राजवटीत लोकांचे सर्व अधिकार हिरावून घेतलेले असतात. क्रांती हे एक स्वतंत्र शास्त्र असून या शास्त्राशी

लोकांचा काहीही संबंध नाही असेच मानले जाते.'

रशियातून झारशाही नष्ट झाल्यानंतर, एकेचाळीस वर्षांचा अज्ञातवास आटोपून क्रोपोटकिन १० जून १९१७ रोजी पेट्रोग्राडमध्ये आला तेव्हा त्याच्या स्वागता-साठी साठ हजार लोक जमले होते. रशियात क्रांती होऊन लोकशाही राजवट अस्तित्वात आल्यामुळे क्रोपोटकिन खूष होता. घटना समिती शक्य तितक्या लव-कर बोलावून लोकशाही राजवट स्थिर करावयास हवी असे तो प्रतिपादन करू लागला आणि त्यामुळे साहजिकच लेनिनचा त्याच्यावर रोष झाला.

१९१७ च्या नोव्हेंबरमध्ये बोल्शेव्हिक क्रांतीचा उद्रेक पाहताच क्रोपोटकिन म्हणाला, 'ही क्रांती नव्हे, मार्च–क्रांतीला जमिनीत गाडण्यासाठी केलेला हा उठाव आहे.' ब्रेस्ट लिटोव्हस्क येथे बोल्शेव्हिक राजवटीने जर्मनीशी केलेला करारही त्याला मान्य नव्हता. तो म्हणाला, 'मी आरंभापासून युद्धाला विरोध करीत आलेलो आहे तरीदेखील शरणागती हा युद्ध थांबविण्याचा मार्ग आहे असं मला वाटत नाही. घटनासमिती बोलवायलाच हवी होती. रशियातील लोकशाही राज-वटीला स्थैर्य देण्याचे महत्त्वाचे कार्य घटनासमितीनं केलं असतं.'

या वेळी क्रोपोटकिन मॉस्कोलगतच्या डिमिट्रोव्ह या लहानशा गावात राहात होता. तो राजकारणात भाग घेत नव्हता. तरीदेखील त्याने आपली ही मते व्यक्त करावीत ही गोष्ट लेनिनला पसंत पडणे शक्य नव्हते. आपले मतप्रतिपादन लेनि-नला आवडत नाही हे माहीत असल्यामुळे क्रोपोटकिनही कधी लेनिनच्या भेटीला गेला नव्हता. परंतु १९१९ च्या मे मध्ये क्रोपोटकिनचा एक मित्र बोल्शेव्हिकांच्या तुरुंगात खितपत होता. त्याला लवकरच फाशी देण्यात येणार आहे असे जेव्हा क्रोपोटकिनला कळले तेव्हा तो लेनिनच्या भेटीस गेला. बाँखब्रुयेव्हिचच्या घरी लेनिन आणि क्रोपोटकिन यांची भेट झाली. आपल्या मित्राला फाशी देण्यात येऊ नये अशी क्रोपोटकिनने लेनिनला विनंती केली. त्यानंतर त्या दोघांत राज्यक्रांती आणि रशियाचे भवितव्य यासंबंधी प्रदीर्घ चर्चा झाली.

क्रोपोटकिन म्हणाला, 'आपल्या प्रतिस्पर्ध्यांनी आक्रमक पावलं टाकू नयेत म्हणून त्यांच्यांतील काहीजणांना ओलीस ठेवायचे आणि तशी वेळ आली की ओलीस ठेवलेल्या लोकांना गोळ्या घालून ठार करायचं हे तुमचं धोरण मला बिलकूल मान्य नाही.'

क्रोपोटकिन सरळ आपल्या धोरणावर टीका करीत असतानाही लेनिन शांत होता. पूर्वी असे घडत नसे. लहानशी टीकादेखील त्याला सहन होत नव्हती. परंतु क्रोपो-टकिनसारखा जुना आणि वृद्ध क्रांतिकारक आपल्यासमोर बसलेला आहे हे पाहून लेनिनने आपला राग आवरला होता. रशियाला कोणते स्वरूप देण्यासाठी आपली ही धडपड आहे हे लेनिन त्याला शांतपणाने समजावून देत होता. लेनिन म्हणाला,

'आपलं दोघांचं ध्येय जरी एक असलं तरी मार्ग भिन्न आहेत. विशेषत: आमच्या आजच्या धोरणाबद्दल तर आपल्या दोघांत खूपच मतभेद आहेत. परंतु आमच्या हातून काही अन्याय घडतो आहे असे जर तुम्हाला वाटलं तर तुम्ही आम्हाला त्याबाबत अवश्य कळवा. स्वत: मी त्या प्रकरणाची चौकशी करीन एवढं आश्वासन देतो.'

क्रोपोटकिन अधून मधून पत्र लिहून लेनिनला विद्यमान परिस्थितीबाबतचे मत कळवायचा. ४ मार्च १९२० रोजी लिहिलेल्या पत्रात क्रोपोटकिन म्हणतो– 'तुमच्या अधिकाऱ्यांना लोकांशी कसे वागायचे असते याची मुळीच माहिती नाही. त्यामुळे हजारो निरपराध नागरिक बळी जात आहेत. ही परिस्थिती अशीच चालू राहिली तर लोक समाजवादाला शिव्या देऊ लागतील. फ्रेंच राज्यक्रांतीनंतर फ्रान्समध्ये अत्याचाराचा एवढा कहर उसळला होता की तो अत्याचार पाहून 'समता' या पवित्र शब्दाला शिवीचे स्वरूप प्राप्त झाले होते. तसे आपल्या येथे समाजवादाचे होऊ नये अशी माझी इच्छा आहे.

माणसे ओलीस ठेवून घेण्याच्या बोल्शेव्हिकांच्या पद्धतीवरही क्रोपोटकिन टीका करीत असे. १९२१ च्या जानेवारीमध्ये लेनिनला धाडलेल्या पत्रात तो लिहितो, 'माणूस कशासाठी ओलीस ठेवला जातो हे आता लोकांना कळून चुकले आहे. ओलीस ठेवलेल्या माणसाने कोणताही गुन्हा केलेला नसतो. केवळ आपल्या प्रतिस्पर्ध्यांवर दडपण आणण्यासाठी त्याचे आप्तेष्ट विनाकारण पकडून ठेवण्याने आपण लोकक्षोभ निर्माण करतो हे बोल्शेव्हिकांनी ओळखले पाहिजे. तुम्हाला जर हा मार्ग पसंत असेल तर मग उद्या तुम्ही मध्ययुगातील छळाची पद्धतही सुरू कराल अशी मला भीती वाटते. जेथे जुलमी राजेशाही अस्तित्वात आहे तेथेही सध्या ओलीस ठेवण्याची प्रथा बंद झालेली आहे. परंतु रशियात मात्र राजेशाही नष्ट झाल्यानंतरच ही प्रथा सुरू झालेली दिसते. कोणत्याही मानवी भावनेचा विचारच करावयचा नाही असा निर्धार करून उभा असलेल्या साम्यवादाच्या नशिबी काय लिहिलेले आहे हे निदान मला तरी सांगता येणार नाही.'

क्रोपोटकिनचे हे पत्र वाचून लेनिन कमालीचा संतापला. तो ओबुख नावाच्या आपल्या मित्राला म्हणाला, 'या म्हाताऱ्याने तर मला भंडावून सोडलेले आहे. त्याला राजकारणातलं एक अक्षर कळत नाही आणि तरीही प्रत्येक वेळी मला उपदेश करण्याचा आव आणतो. महामूर्ख !'

या पत्रानंतर थोड्याच दिवसांनी म्हणजे ७ फेब्रुवारी रोजी क्रोपोटकिन मरण पावला. लेनिन म्हणाला, 'बरं झालं. एक कटकट नाहीशी झाली.'

कोरोलेन्कोच्या बाबतीतही असेच घडले होते. कोरोलेन्कोने तरुणपणी क्रांतिकार्यात भाग घेऊन सैबेरियातील विजनवासाचा अनुभव घेतला होता. १८९७

पासून तो मार्क्सवादावर टीका करीत असे. मार्च–क्रांती झाल्यानंतर कोरोलेन्कोने केरेन्स्कीच्या हंगामी राजवटीचा जोरदार पुरस्कार केला होता. नोव्हेंबरमध्ये बोल्शेव्हिकाचा उठाव यशस्वी झाल्यानंतर ५ डिसेंबर रोजी कोरोलेन्को याने बोल्शेव्हिकांना उद्देशून एक पत्र प्रसिद्ध केले. या पत्रात तो म्हणतो–'तुम्ही सध्या विजयोत्सव साजरा करीत आहात. पण तुमच्याबरोबर लढून ज्यानी झारशाहीचा निःपात केला त्यांच्यावरच आता तुम्ही शस्त्र धरले असल्यामुळे तुमचा हा विजय रशियन जनतेच्या दृष्टीने घातक ठरणार आहे. आज, तुम्ही लोकांचे स्वातंत्र्य हिरावून घेतले आहे. जर लोकांना आपले विचार व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य उरणार नसेल तर तुमच्या या विजयाला काहीही अर्थ नाही. तुमच्या विजयात लोकांचा विनाश साठवलेला आहे.'

कोरोलेन्को मूलतः शांततावादी होता. म्हणून त्याने लाल सैनिकांच्या अत्याचारांप्रमाणेच श्वेत सैनिकांच्या अत्याचारांचाही निषेध केला. केरोलेन्कोचे हे विचार ऐकून लेनिन संतापत असे. कोरोलेन्कोसंबंधी बाँख–ब्रुयेव्हिच याच्याशी बोलताना लेनिन म्हणाला, 'हे लोक स्वतःला क्रांतिकारक समजतात, समाजवादी मानतात, आपण लोकांचे प्रतिनिधी आहोत असा दावा करतात. पण लोकांना नेमकं काय हवं आहे हे यांना विलकूल कळत नाही. रशियात सध्या जे काही घडत आहे त्याचा अर्थ समजावून घेण्याची कोरोलेन्कोच्या डोक्यात किंचितही अक्कल नाही. परंतु आपण त्याच्यावर रागावून चालणार नाही. आपण त्याला आपली भूमिका समजावून सांगण्याचा प्रयत्न करू म्हणजे तरी तो आपल्यावर टीका न करता जमली तर थोडीशी मदतच करील.'

१९२० जूनमध्ये लेनिनने शिक्षणमंत्री लुनाखरस्की याला कोरोलेन्कोची भेट घेण्यासाठी पोल्टाव्हा येथे धाडले. कोरोलेन्कोशी प्रदीर्घ चर्चा करून लुनाखरस्की नाटक पाहायला गेला. एवढ्यात कोणीतरी येऊन कोरोलेन्कोला आपल्या नातेवाइकाला फाशीच्या शिक्षेपासून वाचविण्यासाठी प्रयत्न करण्याची विनंती केली. पावाची नफेबाजी केली असा त्या माणसावर बोल्शेव्हिक पोलिसांनी आरोप ठेवला होता. कोरोलेन्को तसाच उठला आणि लुनाखरस्कोला भेटण्यासाठी नाटयगृहाकडे निघाला. लुनाखरस्की नाटयगृहाबाहेर येताच कोरोलेन्को म्हणाला, 'मघाशी तू जे काही मला सांगितलंस ते खरं करून दाखविण्याची वेळ आलेली आहे. तुम्ही पकडलेला माणूस निरपराध आहे अशी माझी खात्री झाली आहे. तुम्ही त्याला सोडलं पाहिजे.'

'मी या प्रकरणाची चौकशी करतो' असे सांगून लुनाखरस्कीने कोरोलेन्कोचा निरोप घेतला. दुसऱ्या दिवशी लुनाखरस्कीची कोरोलेन्को याला चिठ्ठी आली– 'मी मॉस्कोला पोचण्यापूर्वीच त्या माणसाला फाशी देण्यात आलेले होते.'

यानंतर कोरोलेन्को आणि लुनाखरस्की यांची पुन्हा भेट झाली तेव्हा 'बोल्शे-

व्हिक क्रांतीबद्दल आपल्याला काय वाटत आहे हे आपण लिहून काढणार आहोत' असे कोरोलेन्कोने लुनाखरस्कीला सांगितले. लुनाखरस्की म्हणाला, "तुमचं हे लिखाण 'इझवेस्तिया'मध्ये प्रसिद्ध होईल अशी मी खात्री देतो. मात्र तुमच्या लिखाणाखाली मी माझं स्पष्टीकरणही देत जाईन."

कम्युनिस्ट राजवटीच्या अत्याचारी स्वरूपावर टीका करणारे कोरोलेन्कोचे सहा लेख लुनाखरस्कीने प्रसिद्ध केले नाहीत. अद्यापही ते लेख रशियात प्रसिद्ध झालेले नाहीत.

मक्झिम गॉर्की हा कोरोलेन्कोचा जिवलग मित्र होता. त्यामुळे गॉर्कीला धाडलेल्या पत्रांमध्ये कोरोलेन्कोने आपले विचार मनमोकळेपणाने प्रकट केले आहेत. शिगारेव्ह आणि कोकोशकीन या घटनासमितीच्या उदार मतवादी सदस्यांचा बोल्शेव्हिकांनी खून केल्याचे कळताच गॉर्कीला लिहिलेल्या या पत्रात कोरोलेन्को म्हणतो– 'रोझा लक्जेंबर्ग आणि लायबक्नेखट यांचा जसा राजकीय कारणांसाठी निर्घृण खून करण्यात आला, तसेच हे अमानुष कृत्य आहे. शिगारेव्ह–कोकोशाकिन यांचा खून करणाऱ्यांना मोकळे सोडले जावे यावरून या राजवटीचे स्वरूप समजून येते.'

१९२१ च्या डिसेंबरमध्ये कोरोलेन्कोचे निधन झाले. तत्पूर्वी गॉर्कीला लिहिलेल्या पत्रात तो म्हणतो, 'झारशाहीने क्रांतिकारकांविरुद्ध जे अघोरी उपाय योजले त्याच उपायांचा वापर करून बोल्शेव्हिकांनी आपल्या राजकीय प्रतिस्पर्ध्यांचा निःपात केला याची इतिहासाला नक्कीच दखल घ्यावी लागेल. बोल्शेव्हिकांचे प्रतिस्पर्धीही त्यांच्यासारखेच प्रामाणिक क्रांतिकारक आणि समाजवादी विचारांचे होते. परंतु केवळ ते आपल्याला विरोध करतात या एकाच कारणाकरिता त्यांची हत्या करण्यात आली. क्रांति का करता कामा नये हे यावरून तरी समजून येण्यास हरकत नाही. इतर देशांना हा धडा घालून देण्यासाठी आज रशियातल्या निरपराध नागरिकांना आपल्या प्राणांचे बलिदान करावे लागत आहे! क्रांतीचे नाव निघताच इतर देशांतील लोक म्हणतील–क्रांती कशी असते हे आम्ही पाहिलं आहे, बोल्शेव्हिकांनी आपल्या कृतीनं ते दाखविलं आहे.'

कम्युनिस्टांची क्रांती, त्यांचा समाजवाद, त्यांची लोकशाही यांचा इतर देशांवर कोणता परिणाम होत आहे हे लेनिनला आता प्रत्यक्षच पाहावयास मिळू लागले होते.

(क्रमशः)

# तुमचे भविष्य आमचा अंदाज

श्री. गो. जोशी, सायनाचार्य

## ९ ते १५ मार्च राशि–भविष्य

**मेष** : बाराव्या शनि–मंगळांची तीव्रता आता निश्चितच कमी झाली असेल शिवाय एकादशस्थ बुध–शुक्रांचे हार्दिक सहकार्य मिळत असेल. संपूर्ण यश जरी लाभले नाही, तरी अपेक्षाभंगाचा अनिष्ट काळ आता इतिहासजमा झालेला आहे.

गेल्या आठवडयात हुकलेली संधी या आठवडयात पुन्हा लाभण्यासारखे आशादायक वातावरण दिसायला लागेल.

आता प्रकृतीची विवंचना नाही की, सांपत्तिक चणचणही जाणवणार नाही. विरोधकांची तोंडे बंद करण्याइतके सामर्थ्य आता तुमच्यात आलेले आहे. तुमची सारी स्थगित कार्ये गती घेऊ लागतील, सांसारिक समस्या सुटू लागतील, नोकरी धंद्यांतील प्रगतीची लक्षणे स्पष्टपणे दिसायला लागतील.

१२ ते १५ मार्च अपेक्षा बऱ्याच प्रमाणात सफल होतील.

**वृषभ** : कधी वारा असा वाहो कधी तसा वाहो, तुमचे कर्तव्याचे तारू सदैव पुढेच जात असते. गती कमी अधिक होत राहील इतकेच.

शनि-मंगळ योगाची आता हवा निघून गेलेली आहे. या शनि-मंगळ योगामुळे काही भयंकर घडेल अशी भीती मनात घर धरून बसलेली होती; पण हा निसर्गाचा बार फुसकाच ठरला.

उलट या शनि–मंगळांनी तुम्हाला थोडेफार साहाय्यच केलेले असेल. या आठवडयातील राहु–मंगळयोगही असाच निरुपद्रवी ठरावा.

नवे सहकार्य घेऊन, नवा जोम बाळगून पुढे व्हा. आता तुमचे सहसा कुठेच नडू नये.

स्थावराचा प्रश्न मिटावा, उद्योगधंद्यात मोठी उलाढाल घडावी, सांपत्तिक विवंचनाही हळूहळू कमी व्हावी.

११ ते १३ या काळी अनेक अनुकूल घटना घडाव्यात.

**मिथुन** : या आठवडयात बुध–शुक्रांची युती भाग्यात घडत आहे. या योगात कर्तृत्व, यश, मांगल्य सारे सारे असते याचा प्रत्यय या आठवडयापासूनच यायला लागेल. कौटुंबिक मंगलकार्याचे ठरेल, व्यवसायधंद्यात क्रांती घडवून आणण्याचे विचार बळावू लागतील. समाजात काही विशेष कार्य करून जगापुढे यावे ही

तुमची बऱ्याच दिवसांची असफल आकांक्षा या कालापासून सफल होण्याची लक्षणे दिसायला लागतील.

नोकरीधंद्यांतील प्रगतीच्या नव्या वाटा दृष्टिक्षेपात यायला लागतील. या वेळची आपली धडपड म्हणजे भावी प्रगतीची प्रसादचिन्हेच ठरतील.

यांत्रिक व्यवहाराकडेही आपले लक्ष लागू लागेल. दूरच्या प्रवासाचे प्रस्थान ठेवले जाईल.

दि. १३ ते १५ मार्च या काळी नव्या आशा अंकुरायला लागतील.

**कर्क :** गेल्या आठवड्यातील शनि–मंगळ योग, म्हणजे निसर्गाचे वरदानच ठरले असेल. अशा प्रखर योगांच्या कृपेनेच जीवनात काही भव्य–दिव्य घडू शकते याचाही आपणास प्रत्यय आला असेल.

या आठवड्यातील भाग्यातील राहु–मंगळ योगाचाही आपणास आपली गती वाढविण्यास उपयोग होईल. स्थानांतर, स्थित्यंतर घडले असेल अथवा घडेल. आणि बदलत्या अवस्थेतच तुमच्या नेत्रदीपक प्रगतीची बीजे साठविलेली आहेत असा प्रत्यय येईल.

उच्च अधिकार लाभेल. नवे क्षेत्र हाती येईल, काही भव्य–दिव्य करवून दाखवावे अशा ऊर्मी अंतःकरणात निर्माण व्हायला लागतील.

१० ते १४ या कालावर लक्ष केंद्रित करा.

**सिंह :** सध्याची स्थिती तशी ठीक आहे पण उत्तम नाही म्हणून तुम्ही काहीसे नाराज आहात. तुमच्यासारख्या महत्त्वाकांक्षी व्यक्तींना लहानसे यश खुपत असते. नोकरीधंद्याचे अगदीच काही वाईट नाही, सामाजिक प्रतिष्ठाही उंचावत आहे. पैशाअडक्याबद्दलही काळजी करण्यासारखी स्थिती नाही. थोडाफार त्रास जाणवतो तो प्रकृतीचा आणि त्यामुळे सारेच मुसळ केरात असे वाटून घ्यायचे काही कारण नाही.

या आठवड्यातील राहु–मंगळ योगही असाच कंटाळवाणा जाणवण्याची शक्यता आहे.

दूरचा प्रवास, नव्या व्यवसायाची जबाबदारी या गोष्टी शक्यतो टाळा. धावपळ धडपड वाया जाणार नाही पण परिश्रम फार करावे लागतील. इष्टमित्रांवर फारसा भरवसा ठेवू नका.

दि. ९ ते १२ या काळी काही विशेष गोष्टी घडून याव्यात.

**कन्या :** ग्रहांच्या प्रतियोगाच्या व्यथा गेल्या आठवड्यापासून आपण अनुभवीत आहात. याही आठवड्यात राहु–मंगळ योगाची आणखी भर पडणार आहे. या सर्वांचे आघात आपणास सहन करावे लागणार आहेत. काही दिवस असेच सहन करण्याशिवाय गत्यंतर नाही.

कौटुंबिक कलह आणि क्लेश तीव्रतेने जाणवायला लागतील. भागीदारीचे व्यवहार चिघळू लागतील. कोर्टकचेरीचे प्रसंगही काहींना अनुभवावे लागतील.

कुठेही जा, कसेही शांतपणाने वागा, संघर्ष काही टळत नाही. तुमच्या सहनशक्तीची ही परीक्षाच आहे.

या आठवड्यात सामाजिक राजकीय जबाबदाऱ्या स्वीकारण्याचे शक्यतो टाळा. ११ ते १४ या काळी परिश्रमाचे थोडेफार यश पदरी पडावे.

**तूळ :** गेल्या आठवड्यातील अनुभवावरून तुमची अशी खात्री होऊन चुकली असेल की, निष्ठावंत माणसांच्या वाटेस शनि-मंगळांसारखे ग्रहही जाऊ शकत नाहीत. शनि-मंगळ आले आणि गेले तुम्ही त्यांची दखलही घेतली नाहीत. घेण्याची गरजही भासली नाही.

या आठवड्यात बुध-शुक्रांची तुमच्यावर विशेष कृपा होणार आहे. ते तुमच्या शैक्षणिक कार्यक्रमात घवघवीत यश देऊन जातील, कलाक्षेत्रात अमाप कीर्ती मिळवून देतील, उद्योगधंद्यातही अपेक्षेबाहेर लाभ पदरी टाकू शकतील.

आकर्षक करारमदार घडतील, सांपत्तिक लाभाच्या नव्या योजना आशादायक ठरू लागतील. सौंदर्यप्रसाधने, परराष्ट्रीय व्यापारधंदा, संशोधनात्मक कार्य या बाबतींतही डोळ्यात भरण्यासारखे हातून घडून येऊ लागेल. प्रवासाच्या बाबतीत मात्र विशेष दक्षता बाळगा. दि. १३ ते १५ या काळी अनपेक्षित लाभ पदरी पडावा.

**वृश्चिक :** बुध-शुक्रांची उपस्थिती चतुर्थस्थानी. एवढ्या एकट्या योगानेही तुमच्या साऱ्या समस्या सुटाव्यात. राहत्या जागेची विवंचना मिटेल. नवे स्नेहसंबंध जुळून यायला लागतील. नोकरीत फार मोठी प्रगती होण्याची लक्षणे स्पष्टपणे दिसून यायला लागतील.

भयानक शनि-मंगळांचे पितळ केव्हाच उघडे पडले आहे. आता त्या ग्रहांबद्दल ना खेद ना खंत. तुमच्या आखीव योजना यशस्वी ठरण्यात आता कसलीच अडचण येणार नाही.

दशमस्थ गुरूला आता तुमच्याकरिता भरीव कार्यक्रम आखता येईल. तो तुमचा जाहीर सत्कार घडवून आणील. तुमच्या अंगच्या सुप्त गुणांचा अधिकाधिक विकास घडवून आणील.

दि. १०, १२, १५ मार्च या काळी अनेक चिरस्मरणीय गोष्टी घडाव्यात.

**धनू :** या चतुर्थातील स्फोटक ग्रहांची उग्रता अजूनही कमी झालेली नाही. त्याच विवंचना, त्याच आठवणी, अनारोग्य, सांपत्तिक विवंचना, व्यावसायिक मंदी थोडीफार कमी जाणवली तरी आपणास पूर्णत्वाने काळजीमुक्त होण्यास अजूनही महिनाभर तरी थांबावे लागेल.

भाग्यस्थ गुरू आज ना उद्या तुम्हाला पुढे यायला संधी देणारच आहे. आणि नजीकच्या भविष्यकालातच अशी सुवर्णसंधी तुम्हाला लाभू शकेल. सध्याच्या या खडतर कालावर एकच एक रामबाण उपाय म्हणजे अंगीकृत कार्यावरची निष्ठा चळू न देणे हीच. नम्रतेने, लीनतेने अनेकांची सहानुभूती मिळवा. " राखावी बहुतांची

अंतरे" असे केल्यानेच मनुष्य लवकर भाग्यास येतो ही समर्थांची वाणी प्रत्यक्ष कृतीत उतरवा.

दि १२ ते १४ येथूनच थोडेफार अनुकूल वातावरण दिसू लागेल.

**मकर** : पराक्रमस्थ–पराक्रमी ग्रहांमुळे तुम्हाला आता काहीही करता येईल. प्रत्येक कार्यात विक्रमी यश संपादता येईल. या वेळी पराक्रमाची शर्थ करायला हवी. अनुकूल कालाला कर्तृत्वाची जोड दिल्याशिवाय त्या कालाचे अनुकूल्य प्रत्ययास येऊ शकत नाही. "केल्याने होत आहे रे, आधी केलेच पाहिजे." एवढे शब्द जरी कृतीत उतरविले तरी बस्स आहे !

हा सारा आठवडा अत्युत्तम प्रगतीचा म्हणून चिरंतन स्मृतीचा ठरावा.

वरचेवर प्रवास करावा लागेल. अवघड कामेही यशस्वी करून दाखविण्याची जिद्द बाळगावी लागेल. कर्तृत्वसंपन्न व्यक्तीच्या गळयातच विक्रमी यशाची माला पडू शकते.

अधिकाराचे स्थान लाभेल, सामाजिक प्रतिष्ठा उंचावेल.

दि. ११, १३, १५ मार्च या काली बऱ्याचशा अपेक्षा सफल व्हाव्यात.

**कुंभ** : तुमच्या राशीमध्येच बुध-शुक्रांचे वास्तव्य असल्यामुळे, सध्याचे दिवस आपणास निश्चितच अपेक्षासाफल्याचे जाणवतील.

साडेसाती, शनि-मंगळ युती इ. योगांना या कालापुरते तरी आपण विसरू शकता.

आरोग्य, पैसा, प्रतिष्ठा आणि नोकरीधंद्यांत घवघवीत यश. एवढे द्यायला गुरू-शुक्र कटिबद्ध आहेत. त्यांची कृपा आणि तुमचे प्रयत्न यांचा संगम घडून आल्यावर जगात अशक्य असे काहीच नाही. याच आठवड्यात काही अत्यानंदाच्या घटना घडू लागतील, प्रवास घडेल, अनेकांच्या भेटीगाठीमुळे मन प्रसन्न बनेल.

दि. ९, १०, १५ या काली अपेक्षेप्रमाणे सारे काही घडेल.

**मीन** : तसं काळजी करण्यासारखं विशेष काही घडले नाही, घडणारही नाही. पण हे दिवस विशेषसे स्वास्थ्याचे नाहीत असं आपणास क्षणोक्षणी जाणवू लागेल. मानसिक हुरहूर व चिंता – भविष्यकालासंबंधी वैफल्याची भावना – विरोधकांबद्दल घबराट अशा काही गोष्टी सतत जाणवतील आणि त्यामुळेच हे दिवस काही ठीक नाहीत अशी आपण समजूत करून घ्याल.

काही दिवस सहन करा. पण तुमच्या उद्योगधंद्यावर – सामाजिक प्रतिष्ठेवर कसलाही अनिष्ट परिणाम होणार नाही. या वेळी विशेष परिश्रमाची कामे करू नका आणि संघर्षमय वातावरणात पाऊल टाकू नका. एवढे केलेत म्हणजे सध्याची अनिष्ठा फारशी बाधक ठरणार नाही.

दि. ११, १२, १४ या काली अल्पसा लाभ पदरी पडावा. ○

---

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून, ४१९ नारायण पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. **श्री. ग. माजगावकर.**



नेवासे

ह. भ. प. श्री. सोनोपंत दांडेकर
यांचा केवळ आशीर्वादच नाही
तर प्रभावी पुरस्कारही
नेवासकर नागरिक आणि आसपासच्या
गावातून आलेले
सहस्रावधी खेडूत चकित झाले.
मामा आणि जाहीर सभा !
कधी पाहिले नव्हते
ऐकले नव्हते.
पण आज हे घडत होते.

MANOOS ( Weekly ) : 40 Paise : Regd. No M H-649

